# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्याच्या लोकायुक्तांनी नगर विकास विभागाला पाणी चोरीबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असल्याबाबत

**(१) ४९९९१ (२०-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या लोकायुक्तांनी नगर विकास विभागाला पाणी चोरीबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरांतील पाणीचोरी व पाणी गळतीच्या प्रकारांना कायमचा आळा बसण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे ही आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष तपास पथकाने (एसआयटी) मुंबई शहर व उपनगरांतील पाणीचोरी, पाणी गळती तसेच टँकरमार्फत होणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत योग्य नियमन याचा सखोल तपास करून शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने शासनाने यावर कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत अहवाल दिनांक ०६.०२.२०२३ रोजीच्या सुनावणीदरम्यान मा. लोक आयुक्त यांना सादर करण्यात आला असून, दिनांक १०.०१.२०२४ रोजीच्या सुनावणीदरम्यान मा. लोक आयुक्त यांनी कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य परिवहन महामंडळातील महिला “वाहनचालक” पदाच्या नियुक्त्या प्रलंबित असल्याबाबत

**(२) ५०३९४ (१९-०१-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील महिलांना रोजगार मिळण्यासाठी एसटीत चालक-वाहक पदासाठी आदिवासी आणि दुष्काळग्रस्त भागातील महिलांची निवड करण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला होता तसेच २१५ महिलांची चालक-वाहक म्हणून निवड केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना आणि त्यानंतर संपामुळे आर्थिक तोटा झाल्याने महामंडळाने या महिलांच्या भरतीला स्थगिती दिल्यामुळे २१५ महिलांची चालक-वाहक नियुक्ती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या महिलांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०१-२०२४) :** (१) अशंत: खरे आहे.

सन २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदाकरीता घेण्यात आलेल्या सरळसेवा भरतीमध्ये २०६ महिला उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे.

(२) व (३) सरळ सेवा भरती सन २०२९ अंतर्गत चालक तथा वाहक पदाकरीता निवड झालेल्या २०६ महिला उमेदवारांनी हलके मोटार वाहन चालन परवाना सादर आहे. ज्या महिला उमेदवारांनी अवजड वाहन चालविण्याचे १ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करुन अवजड वाहन चालन परवाना सादर केलेला आहे, अशा एकूण १३१ महिला उमेदवारांना ८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण देण्यात येत असून त्यापैकी ३६ महिला उमेदवारांनी ८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे व ९५ महिला उमेदवारांचे ८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण सुरु आहे.

तसेच, १९ महिला उमेदवारांचे १ वर्षाचे अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण सुरु आहे, व १६ महिला उमेदवारांचे १ वर्षाचे अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. परंतु त्यांची प्राथमिक वाहन चालक चाचणी बाकी आहे. उर्वरीत ४० महिला उमेदवार हजर होणेसाठी कळवून देखील गैरहजर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील शैक्षणिक सत्र २०१७-२०१८ मधील प्रवेशित SC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत

**(३) ५१२५१ (१८-०१-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील शैक्षणिक सन २०१७-२०१८ मधील प्रवेशित SC प्रवर्गातील विद्यार्थ्यांनि महाइस्कॉल पोर्टल वर नूतनीकरण करताना आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे शिष्यवृत्तीचे प्रस्ताव मंजुरी करण्यासाठी ऑफलाईन पद्धतीने सहायक आयुक्त समाजकल्याण बुलढाणा यांचेकडे सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयांच्या मागणीनुसार सहायक आयुक्त समाज कल्याण, बुलढाणा यांनी निधी मागणीचे प्रस्ताव समाज कल्याण विभागाकडे पाठवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी संबंधितांना शिष्यवृत्ती देण्यासाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार आहेत काय, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सहायक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा यांनी शिष्यवृत्ती १ वर्षापेक्षा जास्त वर्षाची प्रलंबित असल्याने अन्वेषण प्रस्ताव सादर करुन ज्यास शासनाची मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक होते व त्यानंतर निधीची मागणी करणे आवश्यक होते. सहायक आयुक्त, बुलढाणा यांनी या विहीत पध्दतीचा अवलंब न केल्यामुळे त्यांना दि.१६.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(३) होय,

सदर प्रकरणी वित्त विभागाच्या दि.१७.०४.२०१५ च्या शासन निर्णयासोबत वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.६, नियम ४० नुसार देयक कोषागार कार्यालयात सादर करण्यासाठी देयकासोबत अन्वेषण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा यांना उचित कार्यवाही करुन अन्वेषण प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई सागरी किनारा मार्ग प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४) ५२१८३ (२०-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सागरी किनारा मार्ग प्रकल्पाचे काम माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये सुरू करण्यात आले असून सदरहू प्रकल्प सन २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना प्रादुर्भावाच्या दोन वर्षाच्या कालावधी तसेच मा.उच्च न्यायालयाने या प्रकल्पाला दिलेली स्थगिती या कारणांमुळे सदरहू प्रकल्प विहीत मुदतीत पूर्ण होत नसल्याने तो आता किती कालावधीत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे,

(३) या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या दोन भुयारी मार्गांबाबतची सद्य:स्थिती काय आहे, सदरहू भुयारी मार्ग किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(४) तसेच सदरहू प्रकल्पाच्या पूर्ततेस होत असलेल्या विलंबामुळे या प्रकल्पाकरिता किती अतिरिक्त निधी खर्च होणे अपेक्षित असून या प्रकल्पावरील एकूण खर्चाचा तपशील काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत किनारी रस्ता प्रकल्पाचे काम, १२० मीटर अंतराच्या पुलाचे काम वगळता माहे नोव्हेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१२० मीटर अंतराच्या पुलाचे काम माहे मे, २०२४ अखेरीस पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील पहिल्या बोगद्याचे खणन काम माहे जानेवारी, २०२२ मध्ये पूर्ण झाले असून, दुसऱ्या बोगद्याचे खणन काम माहे मे, २०२३ मध्ये पूर्ण झाले आहे.

(४) कोरोना प्रादुर्भाव व मा. उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश यामुळे झालेल्या विलंबामुळे मुंबई किनारी रस्ता प्रकल्प खर्चात कोणतीही अतिरिक्त वाढ झालेली नाही. तथापि केंद्र शासनाच्या वस्तू व सेवा करांमध्ये १२ टक्क्यावरुन १८ टक्के इतकी वाढ झाल्यामुळे रु. ३३९ कोटी आणि स्थानिक कोळी बांधवांच्या मागणीनुसार वरळी येथील पुलाच्या दोन खांबांमधील अंतर वाढविल्यामुळे रु. ९२३ कोटी अशी एकूण रु. १२६२ कोटी इतकी अतिरिक्त वाढ सदर प्रकल्प खर्चामध्ये होणे अपेक्षित आहे.

सदर प्रकल्पाचा मूळ प्रकल्प खर्च एकूण रु. १२,७२१ कोटी इतका होता. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाचा सुधारीत प्रकल्प खर्च रु. १३,९८३ कोटी इतका आहे.

---

## केज (जि.बीड) येथे बस आगाराचे काम कार्यान्वित करण्याबाबत

**(५) ५४१४९ (२५-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथे माजी मंत्री स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांच्या प्रयत्नानी बस अगारासाठीची जमीन राज्य परिवहन महामंडळच्या ताब्यात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन उपलब्ध असून मागील १५ ते २० वर्ष होऊनही बस आगाराचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बस आगाराचे काम कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी राज्याचे परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुषगाने बस आगारास निधी उपलब्ध करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०१-२०२४) :** (१) सदरची जमीन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यात आहे.
(२) व (३) होय.
(४) व (५) केज येथून धारुन आगार हे १३.५ कि.मी व कळंब आगार १९ कि.मी अंतरावर आहे. तसेच अंबाजोगाई आगार ३८.३ कि.मी अतंरावर आहे. त्यामुळे सद्य स्थितीमध्ये केज येथे आगार बांधणे संयुक्तीक नाही. भविष्यात ई-बसेस चार्जींग स्टेशन करिता सदरची जागा योग्य आहे.

---

**हिंगणा (जि.नागपूर) एमआयडीसी अंतर्गत विविध कंपन्या असून रसायनयुक्त पाणी नाल्यात सोडल्याबाबत**

**(६) ५५०१८ (२३-०१-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील हिंगणा एमआयडीसी अंतर्गत विविध कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असून अनेक वेळा रसायनयुक्त पाणी अमर नाल्यामध्ये सोडल्याचे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीचे रासायनिक पाणी कंपनीत जमा करुन ते टँकरने बुटीबोरी शुध्दीकरण केंद्रात पाठवणे बंधनकारक असताना बहुतांश कंपन्या त्याचे पालन करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नियमांचे पालन न करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) माहे ऑगस्ट, २०२२ रोजी हिंगणा एमआयडीसी क्षेत्रातील २ उद्योगांमधून पाण्याचा निचरा अमर नाल्यात होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार सदर उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती. सद्यस्थितीत दोन्ही उद्योगातून औद्योगिक सांडपाणी नाल्यात सोडण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील अग्निशामक पदाच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत**

**(७) ५६५०५ (२४-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील अग्निशामक पदाच्या ९१० जागांसाठी भावदेवी मैदान, दहिसर येथे सरळसेवा पद्धतीने भरती प्रक्रिया सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील परीक्षेसाठी राज्यभरातून आलेल्या तरुणांना कडाक्याच्या थंडीत उघड्यावर झोपून रात्र काढावी लागली असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस भरती, अग्निशमन भरती, सेना भरती परीक्षासह वेगवेगळया परीक्षांना राज्यभरातून शहरी भागात येणाऱ्या युवकांना परीक्षेच्या काळात राहण्याची व्यवस्था करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात भरतीकरिता आलेल्या तरुणांना महानगरपालिका शाळांमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सदर शाळांमध्ये जाण्याकरिता उमेदवारांना वारंवार आवाहन / विनंती करण्यात येत होती.

तथापि, भरती प्रक्रियेकरिता रांगेमध्ये प्रथम क्रमांक यावा याकरिता उमेदवार सदर शाळांमध्ये न जाता भरतीच्या ठिकाणी थांबत होते.

तसेच, पोलीस शिपाई / पोलीस शिपाई (चालक) भरती २०२१ ची मैदानी चाचणी दिनांक ३१.०१.२०२३ ते दिनांक १७.०४.२०२३ या कालावधीमध्ये घेण्यात आली होती. त्याकरिता मैदानी चाचणीसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांसाठी गृह विभागामार्फत पुढीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या:-

• उमेदवारांना राहण्यासाठी मंडप बांधण्यात आले होते.
• उमेदवारांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून धावण्याच्या ट्रॅकवर कापडी छत उभारण्यात आले होते.
• मुबलक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.
• सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात आली होती.
• प्राथमिक वैद्यकीय उपचारासाठी डॉक्टरांसह अन्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती.
• उमेदवारांना तातडीच्या उपचारासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली होती.
• मैदानांवर सवलतीच्या व योग्य दरात पिण्याचे पाणी, लिंबूपाणी, केळी, ग्लुकॉन डी, बिस्कीट इत्यादी वस्तू उपलब्ध होण्याकरिता कॅन्टीनची सुविधा करण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सुस्थापित होण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत**

**(८) ५६६५५ (०७-०६-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या प्रादुर्भाव काळात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामध्ये दररोजचे ६० ते ६२ प्रवाशी संख्येत घट झाल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी केलेला संपामुळे महामंडळाला यंदाच्या वर्षात एक हजार कोटीचे नुकसान झाले असून कंत्राटदारांची कोटी रुपयांची देणी थकित असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळ संपुष्टात येण्याचा मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार राज्य परिवहन महामंडळ सुस्थापित होण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) होय.

(२), (३) व (४) कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे तसेच रा.प कर्मचाऱ्यांनी माहे ऑक्टोंबर २०२१ ते एप्रिल २०२२ या कालावधीत पुकारलेल्या बेमुदत संपामुळे वाहतुक बऱ्याच प्रमाणात बंद होती. त्यामुळे प्रवाशी संख्येत घट झाली असल्यामुळे सन २०२१-२२ च्या अलेखापरिक्षीत वाषिर्क लेख्यामध्ये (अंदाजित) रु.११००.०० कोटींचे नुकसान झालेले आहे. राज्य परिवहन महामंडळाची माहे मार्च २०२३ अखेर कंत्राटदाराची रु.१४०.१२ कोटीची देणी प्रलंबित होती. सदयास्थितीत निधीच्या उपलब्धते नुसार कंत्राटदाराची प्रलंबित देणी बहुतांशी प्रमाणात अदा केलेली आहेत. तसेच कंत्राटदाराची माहे जून २०२३ अखेर रू.११०.३५ कोटी उर्वरीत देणी सुध्दा निधी उपलब्धतेनुसार दैनंदिन वाहतुक उत्पन्नातुन अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.

रा.प. महामंडळाच्या ताफ्यात नवीन १५० ईलेक्ट्रीक बसेस व साध्या ५०० बसेस भाडेतत्वावर घेण्यात आल्या आहेत. साध्या प्रकारातील ५०० बसेस दाखल झालेल्या असून ६० ईलेक्ट्रीक बसेस देखील दाखल झाल्या आहेत. तसेच रा.प. महामंडळाच्या ताफ्यात ५१५० इलेक्ट्रिक बसेस भाडेतत्वावरील घेण्याबाबत संचालक मंडळाने मंजुरी दिली असुन सदर बसेसकरिता निविदा प्रक्रिया झाली असून कार्यादेश देण्यात आला आहे. तसेच रा.प.कर्मचाऱ्यांचे दरमहा वेतन राज्यशासना मार्फत देण्यात येत आहे.

---

## मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील यलो गेट ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत जाणारा पोयसर नदीचा सेवा रस्ता विकसित करण्याबाबत

**(९) ५६६९७ (२४-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील यलो गेट ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत जाणारा पोयसर नदीचा सेवा रस्ता विकसित झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा सेवा रस्ता न झाल्यामुळे पोयसर नदीतील गाळ काढण्यास अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा रस्ता विकसित करण्याकरिता मुंबई महानगरपालिका प्रयत्न करत आहे परंतु त्यात विविध अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन सदरहू अडथळे दूर करुन पोयसर नदीचा सेवा रस्ता विकसित करण्याबाबत कोणती कार्यवाही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) महिंद्रा यलो गेट ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत जाणाऱ्या पोयसर नदीतील गाळ दरवर्षी पश्चिम द्रुतगती महामार्गावरुन ग्रीन गेट येथून साफसफाईची यंत्रे नदीच्या पात्रात उतरवून पावसाळापूर्व काढण्यात येतो. तथापि सदर नाल्याला लागून सेवा रस्ता पूर्णपणे विकसित झाल्यास संबंधित गाळ काढणे सुलभ होणार आहे.

विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार नाल्याच्या दोन्ही बाजूस ६ मी. रुंदीची मोकळी जागा असणे अपेक्षित आहे. तसेच नदीतील / नाल्यातील गाळ काढण्यासाठी सुध्दा दोन्ही बाजूस कमीत कमी ६ मी. रुंदीचे सेवा रस्ते असणे अपेक्षित आहे.

(३) हे खरे आहे.

२०० मी. चा लांबीचा पोहोच रस्ता मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या मालकीच्या भूखंडातून जात असल्याने बाधीत बांधकामे हटविणे आवश्यक आहे.

पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या दिशेने असलेल्या ६० मी. लांबीचा पोहोच रस्त्याच्या लगत मे. अदानी इलेक्ट्रिसिटीचा उच्च दाबाचा विजेचा खांब असल्यामुळे सदर खांब पोहोच रस्त्यात अडथळा ठरत आहे. त्यामुळे सदर खांब स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

(४) प्रस्तावित अंदाजे ४१० मी. लांबीच्या रस्त्यापैकी अंदाजे १५० मी. लांबीचा रस्ता तात्पुरता कच्चा स्वरुपात विकसित करण्यात आला आहे.

उर्वरित २६० मी. लांबीच्या रस्त्यापैकी मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या मालकीच्या भूखंडातून जाणाऱ्या २०० मी. लांबीचा पोहोच रस्ताबाबत वेळोवेळी संयुक्त बैठकांमधून व पत्रव्यवहाराद्वारे बाधीत बांधकामे हटविण्याबाबत मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीला कळविण्यात आले आहे.

तसेच ६० मी. लांबीच्या पोहोच रस्त्यालगत असलेला उच्च दाबाचा विजेचा खांब स्थलांतरीत करण्याकरिता मे. अदानी यांच्यासोबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बैठका व पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानुषंगाने मे. अदानी

इलेक्ट्रिसिटी कंपनीने केलेल्या विनंतीनुसार पायलॉन (जी.बी.टी.) स्थलांतरीत करण्याकरिता सुचविण्यात आलेल्या चार पर्यायी जागांबाबत लेखी स्वरुपात मे. अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनी यांना पत्र देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराचे बांधकाम अत्याधुनिक पध्दतीने करणेबाबत**

**(१०) ५६७३२ (२८-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराचे बांधकाम अत्याधुनिक पध्दतीने करुन उर्वरित जागांचा विकास खाजगी विकासकामार्फत बीओटी तत्वावर करण्यासंदर्भातील योजनेवर निर्णय घेण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस स्थानकाचे बांधा-वापरा-हस्तांतर करा (बीओटी) तत्वावर पुनर्विकास करण्याचे काम प्रलंबित असल्याने प्रवाशांना सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्यामुळे नागरिकांची व प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मागील काही महिन्यांपूर्वी ५०० ई-बसेस भाडयाने घेण्याचाही निर्णय घेतला असून शासन एसटीचे खाजगीकरण करण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराचे प्रलंबित काम सुरु करण्याबाबत व बसस्थानक बीओटी तत्वावर बांधण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत निर्णय घेणार आहे काय वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) होय.
(२) व (३) नाही.
(४) व (५) बसस्थानक बीओटी तत्वावर बांधण्याचा निर्णय रद्द करण्याबाबतचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

---

**मुंबईस्थित फेरीवाला धोरण प्रलंबित असल्याबाबत**

**(११) ५६७५६ (२४-०४-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्वोच्च न्यायालयाने सन २०१४ मध्ये फेरीवाला धोरण बनवण्याचे निर्देश मुंबई महानगरपालिकेला दिले असले तरी सर्वेक्षणातील पात्र-अपात्र फेरीवाल्यांचा घोळ, शहर फेरीवाला समिती, नगरसेवक आणि फेरीवाला प्रतिनिधीची नियुक्ती अशा वेगवगळया कारणांनी धोरण लागू होऊ शकले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पालिका प्रशासनातर्फे कोणतेही पाऊल न उचलल्यामुळे याचा फटका सर्वसामान्य मुंबईकरांना बसला असुन चालण्यासाठी एकही मोकळा रस्ता किंवा पदपथ नसल्याने मुंबईकरांची फरफट होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनातर्फे कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) केंद्र शासनाने दिनांक ०१.०५.२०१४ रोजी पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ प्रसिध्द केला. राज्य शासनाने दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ तसेच दिनांक ९ जानेवारी २०१७ रोजी पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र), योजना, २०१७ प्रसिद्ध केली आहे. अधिनियम, नियम व योजना यांमधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुख्य नगर पथविक्रेता समिती तसेच परिमंडळीय स्तरावर ७ परिमंडळीय नगरपथ विक्रेता समिती गठीत करण्यात आल्या आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपील ४१५६-४१५७ मधील सन २००२ मध्ये दिनांक ०९.०९.२०१३ रोजीचे आदेश व राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ अनुसार स्थापन केलेल्या नगर पथविक्रेता समितीच्या मान्यतेने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे जुलै २०१४ मध्ये एकूण १,२८,४४३ फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यापैकी एकूण ९९,४३५ फेरीवाल्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्रमांक ६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१.११.२०१७ रोजी दिलेल्या आदेशान्वये सदर सर्वेक्षण ग्राह्य धरण्यात आले आहे. अधिनियम, नियम व योजना यांमधील निकषांची पूर्तता करणारे एकूण १५,३६१ पात्र अर्जदार तसेच सदर अधिनियम, नियम व योजना यांमधील तरतुदीनुसार ४०४ रस्त्यांवर निश्चित केलेल्या ३०,८३२ पथविक्री जागा यांना परिमंडळीय नगर पथविक्रेता समिती तसेच नगर पथविक्रेता समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच नगर पथविक्रेता समितीमध्ये नगरसेवकांना “विशेष निमंत्रित” म्हणून समावेश करणेबाबत दिनांक १०.०६.२०२२ रोजी शासनाने अभिप्राय दिले आहेत.

माहे जुलै २०१४ मध्ये केलेल्या पथविक्रेत्यांच्या सर्वेक्षणात प्राप्त ९९,४३५ अर्जांमधील पथविक्रेता असल्याचे सिद्धतेची पडताळणी झालेल्या ३२,४०७ पथविक्रेत्यांची यादी दिनांक ०३.०५.२०२३ रोजी संपन्न झालेल्या नगर पथविक्रेता समितीच्या बैठकीत प्राप्त मंजुरीनुसार महानगरपालिका संकेतस्थळावर दिनांक १५.०६.२०२३ ते दिनांक १४.०७.२०२३ या कालावधीकरीता हरकती/सुचनांकरीता प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुषंगाने प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी घेऊन अंतिमत: नगर पथविक्रेता समितीच्या मान्यतेने पथविक्रेत्यांमधुन प्रतिनिधींची निवड करण्याच्या प्रयोजनाकरिता कामगार आयुक्तांकडे नोंदणीकृत पथविक्रेत्यांची अंतिम यादी पाठविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येऊन पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथ विक्री विनियमन) अधिनियम-२०१४ ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

(२) व (३) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये रेल्वे स्थानकांपासून १५० मीटर या प्रतिबंधित क्षेत्रातील अनधिकृत फेरीवाल्यांचे अतिक्रमण, नागरिकांच्या तक्रारीत नमूद अनधिकृत फेरीवाल्यांचे अतिक्रमण तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अनधिकृत फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाविरुद्ध दैनंदिन पातळीवर नियमितपणे निष्कासनाची कारवाई केली जात आहे.

माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत एकूण १,७५,९८० अनधिकृत पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणाविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून, सदर कारवाईत एकूण रु. २.५० कोटी इतका तसेच माहे जानेवारी, २०२३ ते मार्च २०२३ या कालावधीत एकूण ४५,००६ अनधिकृत पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणाविरुध्द निष्कासनाच्या कारवाईत एकूण रु. ६१.४३ लाख इतका विमोचन आकार महसूल वसुल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विभागातील बहुतांश हिरकणी कक्ष बंद असल्याबाबत

**(१२) ५६८३३ (१०-०५-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसने प्रवास करणाऱ्या मातांना बाळाला स्तनपान देण्यासाठी “हिरकणी कक्षाची” स्थापना केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना राबविण्याच्या घेतलेल्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी न झाल्यामुळे बहुतांश मुंबई विभागातील "हिरकणी कक्ष" बंद असल्याचे आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाने प्रत्येक बसस्थानाकात हिरकणी कक्ष कार्यान्वित केला नसल्याने हिरकणी कक्ष जनजागृती अभावी बंद स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुषंगाने मुंबई विभागातील बसस्थानकांवर "हिरकणी कक्ष" योजना कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०१-२०२४) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) रा.प.महामंडळाच्या बसेसने प्रवास करणाऱ्या स्तनदा मातांकरीता "हिरकणी कक्ष" योजना सुरु केली असून या योजने अंतर्गत मुंबई विभागातील पाच बसस्थानकांपैकी उरण, कुर्ला नेहरुनगर, परेल तसेच मुंबई सेंट्रल बसस्थानकावर "हिरकणी कक्ष" कार्यान्वित झालेला आहे. सध्या मुंबई सेंट्रल व दादर (व्होल्व्हो) बसस्थानकावर महिला व बालविकास विभाग यांचेकडून नवीन अद्यावत हिरकणी कक्ष उभारण्यात आले असून परळ बसस्थानकावर अद्यावत हिरकणी कक्ष उभारण्याची कार्यवाही सुरु आहे. हिरकणी कक्षांची दैनंदिन स्वच्छता केली जाते. तसेच सर्वांना निदर्शनास येईल अशा ठिकाणच्या दर्शनी भागामध्ये नामफलक देखील बसविण्यात आलेला आहे.

---

### मुंबईतील मालाड (पूर्व) येथील महानगरपालिकेच्या पी-उत्तर विभागातील उद्यानाच्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याबाबत

**(१३) ५७०८५ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड (पूर्व) महानगरपालिकेच्या पी-उत्तर विभागातील, टाइम्स ऑफ इंडिया जवळील, शहिद विजय साळस्कर उद्यान, पारेख नगर येथील प्रियदर्शनी इंदिरागांधी उद्यान, दिंडोशी न्यायालयाच्या मागे, जनरल अरुणकुमार वैद्य क्रिडांगण आणि महानगरापालिकेच्या ३ उद्यानाच्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पालकमंत्री, मुंबई उपनगर जिल्हा यांना दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या लेखी निवेदनान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी संरक्षक भिंत बांधणेबाबत आवश्यक निधीची तरतुद करुन सदरच्या प्रस्तावास मंजूरी देऊन काम तातडीने सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने तथा म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) अशा आशयाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभागातील टाईम्स ऑफ इंडियाजवळील शहीद विजय साळस्कर उद्यानाची संरक्षक भिंत रहेजा संकुल व शहीद विजय साळस्कर यात सामाईक असल्याने तसेच सदर भिंतीचे बांधकाम रहेजा विकासकाने केले असल्याने सदर भिंत रहेजा संकुला यांनी दुरुस्त करणे / बांधकाम करणे याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
पारेख नगर येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी उद्यान, दिंडोशी न्यायालयाच्या मागे, जनरल अरुणकुमार वैद्य क्रिडांगण या दोन्ही ठिकाणी भिंतीचे बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर - ५ येथील महानगरपालिकेच्या सिंधु एज्युकेशन सोसायटी संस्थेस देण्यात आलेली सनद रद्द करण्याबाबत**

**(१४) ५७४६३ (०९-०५-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर - ५ येथील महानगरपालिकेच्या शाळा क्र.१९ व २२ लगत असलेल्या मोकळ्या मैदानाची सिंधु एज्युकेशन सोसायटी (बी.जी.टिळक शाळा) या संस्थेस देण्यात आलेली सनद तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्याकडे दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना सदर सनद रद्द करणेकामी विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे The Displaced Persons ( Compensation And Rehabilitation ) Act, १९५४ चे कलम ३३ अन्वये अपील दाखल करण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर पत्राच्या अनुषंगाने दिनांक ०२.०३.२०२३ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांचेकडे अपील दाखल करण्यात आले असून, सदर अपील सुनावणीकरिता प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील सार्वजनिक शौचालयाच्या स्वच्छतेबाबत केलेल्या घोषणेबाबत**

**(१५) ५९१३० (११-०५-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये दिवसातून पाच वेळा स्वच्छ केली जातील अशी घोषणा मुंबई महानगरपालिकेने केली असल्याचे माहे जानेवारी २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणेला चार महिन्याचा कालावधी उलटल्यानंतर देखील अद्याप शौचालयचालकांना यासंदर्भात सूचना किंवा प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पाच वेळा शौचालय साफ करण्याच्या कोणत्याही लेखी सूचना किंवा नोटीसा मिळाले नसल्याचे पे ॲण्ड युज शौचालय चालविणाऱ्यांचे म्हणणे असल्याचे कळले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील सार्वजनिक शौचालयांची नियमितपणे स्वच्छता राखून मुंबईतील नागरिकांना सुसज्ज असे सार्वजनिक शौचालये उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबईतील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये दिवसातून पाच वेळा स्वच्छ केली जातील अशी घोषणा झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शौचालय प्रचालक संस्थांना शौचालये दिवसातून पाच वेळा स्वच्छ ठेवण्याबाबत लेखी सूचना दिल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

अशी कोणतीही माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालये नियमितपणे स्वच्छ केली जातात. तसेच सुसज्ज अशी सार्वजनिक शौचालये उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई उपनगर घाटकोपर येथील पारेख रुग्णालयात आग लागून दहा जणांचा झालेला मृत्यु

**(१६) ५९३२३ (२२-०४-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर घाटकोपर पूर्व रेल्वे स्थानकाबाहेरील पारेख हॉस्पिटल येथे आग लागून एकाचा मृत्यू तर दहा जण जखमी झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची पूर्ण चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) सदर आग पारेख रुणालयालगतच्या घाटकोपर रेल्वे स्टेशनसमोरील जवाहर रोड येथील माधव अपार्टमेंट या इमारतीच्या तळमजल्यावरील इलेक्ट्रिक केबीनमध्ये दिनांक १७.१२.२०२२ रोजी लागली होती.

सदर आगीत एक पुरुष मृत तसेच, ७ पुरुष व ३ महिला जखमी झाल्या होत्या.

(२) व (३) सदर आगीच्या घटनेची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, तपासणीअंती सदर आगीचे संभाव्य कारण "सदोष विद्युत प्रणाली" असे आहे.

माधव अपार्टमेंटमधील सर्व आस्थापनांची तपासणी करुन विनापरवाना चालविण्यात येणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांना सुचविण्यात आले आहे. तसेच परवाना घेताना बंधनकारक असलेल्या आस्थापनांना "अग्निसुरक्षा पूर्तता प्रमाणपत्र" घेण्यास सांगण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत सन २०१९ मधील सरळ सेवा भरती प्रक्रियेमध्ये चालक तथा वाहक या पदावरील उमेदवारांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१७) ५९६४९ (२६-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत सन २०१९ मधील सरळ सेवा भरती प्रक्रियेमध्ये चालक तथा वाहक पदाकरीता दुष्काळग्रस्त जिल्ह्याकरीता पदभरती केलेल्या पात्र उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिह्यातील पात्र उमेदवारांची वैद्यकीय तपासणी पुर्ण होवून एम.ई.ओ.टेस्ट ही पुर्ण झालेली असतानाही विभाग नियंत्रक, कोल्हापूर यांचेकडून या उमेदवारांना सेवेत हजर करून घेण्यास दिरंगाई करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुंषगाने चालक तथा वाहक या पदावरील उमेदवारास तात्काळ सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत रा.प.कोल्हापूर विभागाची चालक तथा वाहक पदाची २५८ उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार करण्यात आली होती त्यामधील १५ उमेदवार हे गैरहजर/अपात्र ठरले असून अंतिम निवड यादीवरील २३६ उमेदवारांना नेमणूका देण्यात आल्या आहेत व उर्वरीत ७ उमेदवारांचे नेमणूकपूर्व प्रशिक्षण सुरु आहे.

---

## राज्यातील प्रदूषित नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडयाची अंमलबजावणी व सनियंत्रण दलाची स्थापना करण्याबाबत

**(१८) ५९८२० (०७-०६-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रदूषित नद्यांच्या ५३ पट्टयातील प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडयाची अंमलबजावणी तसेच सनियंत्रण करण्यासाठी ३६ जिल्ह्यातील स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणातील पैनगंगेसह नद्यांचे ५३ पट्टे प्रदूषित असून मागील ४ वर्षात जिल्हास्तरीय दलांच्या अनेक जिल्हयात बैठकाच झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुंषगाने राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडयाची अंमलबजावणी व सनियंत्रण दलाची स्थापना करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे आदेशानुसार दि.२१/०८/२०१९ व दि. १८/०९/२०१९ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे अध्यक्षतेखाली आणि दि. ०९/१२/२०१९ रोजी जिल्हाधिकारी, अकोला यांचे अध्यक्षतेखाली अनुक्रमे बुलढाणा व अकोला जिल्ह्यांच्या जिल्हास्तरीय पर्यावरणीय कृती दलाच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत. नद्यांच्या प्रदूषित पट्टयांचे पुनर्जीवन करण्याकरीता कृती आराखडा केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाला सादर करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि. ठाणे) महानगरपालिका हद्दीतील जीवन प्राधिकरणाकडे असलेली जागा महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत

**(१९) ६०३९१ (२४-०४-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जीवन प्राधिकरणाकडे असलेली जागा उल्हासनगर महानगरपालिकेला हस्तांतरित करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री, पाणीपुरवठा मंत्री महोदय तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या जीवन प्राधिकरण यांच्याकडे आनंद नगर येथील बुस्टर पम्पिंग स्टेशन जवळील निवासस्थानाजवळील एकूण ३२ सदनिका व मोकळी जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असूनही सध्या या जागेचे संरक्षण महानगरपालिका करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागा महानगरपालिकेच्या विविध विकास कामासाठी उपलब्ध करून द्यावी अशी विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील आनंदनगर बुस्टर स्टेशन जवळील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील ३२ सदनिका असलेल्या दोन इमारती व मोकळी जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना दिनांक १४.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## चिखली, तळवडे MIDC तील कंपन्यांमधील रसायनमिश्रित पाणी इंद्रायणी नदीमध्ये सोडल्यामुळे होणारे प्रदूषणाबाबत

**(२०) ६०७४८ (२५-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली, तळवडे (जि.पुणे) MIDC मधील अनेक कारखान्यांमधून रसायने मिश्रित पाणी कोणतीही आवश्यक प्रक्रिया न करता नाल्यांद्वारे थेट इंद्रायणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारखान्यातील रसायन मिश्रित पाण्यावर प्रकिया न करता नियमबाह्यरित्या इंद्रायणी नदीत सोडले जात असणाऱ्या कंपन्यांनावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुंषगाने पाण्याच्या प्रदुषणाला आळा घालण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२४) :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबतचे वृत्त जानेवारी, २०२३ मध्ये स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाले होते.
(२) व (३) वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि. ३०.०१.२०२३ रोजी चिखली, तळवडे व आजूबाजूच्या परीसरातील उद्योगांच्या पाहणीदरम्यान दोषी आढळून आलेल्या ७ कंपन्यांस दि.०६.०२.२०२३ व ०८.०२.२०२३ रोजी प्रस्तावित आदेश व तद्नंतर अंतरीम आदेश बजावण्यात आले आहेत तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील विना प्रक्रिया घरगुती सांडपाणी नद्यांमध्ये मिसळत असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दि. ०६.०२.२०२३ रोजी प्रस्तावित आदेश व दि. ३०.०६.२०२३ रोजी अंतरीम आदेश बजावण्यात आले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कुदळवाडी नाला येथे ३ एम.एल.डी. क्षमतेच्या घरगुती/औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसवण्याचे काम सुरु असून सद्यस्थितीत ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. तसेच चिखली येथे १२ एम.एल.डी. क्षमतेचा घरगुती सांडपाणी प्रक्रीया सयंत्रणा बसवण्याचे काम सुरु असून सदर प्रकल्प ऑगस्ट, २०२४ पर्यंत कार्यान्वीत होईल. त्याचप्रमाणे भोसरी येथे ७ एम.एल.डी. क्षमतेचा घरगुती सांडपाणी प्रक्रीया सयंत्रणा बसवण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील के.ई.एम. व नायर रुग्णालयातील नवीन यंत्रसामुग्रीबाबत

**(२१) ६०९७८ (०७-०६-२०२३). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील के.ई.एम. व नायर रुग्णालयातील एम.आर.आय. व सी.टी.स्कॅन मशीन अनेक महिने बंद असून नवीन मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया महानगरपालिका प्रशासनामार्फत राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खरेदी प्रक्रिया पुर्ण होऊन नवीन मशीन आजतागायत रुग्णालयात स्थापित करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त यंत्रसामुग्री स्थापित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयातील सीटी स्कॅन व एम.आर.आय. मशीनवर क्षमतेपेक्षा जास्त वर्कलोड असल्यामुळे व मशीन २४ X ७ सुरु असल्यामुळे तांत्रिक बिघाड टाळण्यात येत नाही. तथापि मशीन सुरु ठेवण्याचे सर्व प्रयत्न कायम करण्यात येत आहेत. सदर रुग्णालयात माहे मे, २०२३ मध्ये एकूण २२०७ रुग्णांचे सीटी स्कॅन व ६२९ रुग्णांचे एम.आर.आय. तसेच दिनांक १९.०६.२०२३ पर्यंत एकूण १०८९ रुग्णांचे सीटी स्कॅन व ३८१ रुग्णांचे एम.आर.आय. करण्यात आले आहे.
नायर रुग्णालयातील एम.आर.आय. मशीन सद्य:स्थितीत कार्यरत आहे. तसेच नवीन सीटी स्कॅन मशीन खरेदी करुन, (Turnkey, dismantling of old machine) चे काम सुरु आहे व पुढील ३ महिन्यांत इन्स्टॉल होऊन मशीन सुरु करणे अपेक्षित आहे.
के.ई.एम. व नायर या दोन्ही रुग्णालयांकरिता नवीन एम.आर.आय. मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. तसेच नवीन सीटी स्कॅन मशीन खरेदीकरिता के.ई.एम. रुग्णालयास दरपत्रिका प्राप्त झाली असून, नियुक्त कंत्राटदारास सदर खरेदीबाबत आयात मालाकरिता दिनांक ०१.०३.२०२३ व नायर रुग्णालयाकरिता दिनांक ०६.०३.२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सदर दोन्ही रुग्णालयांसाठी अपरिवर्तनीय पतपत्र दिनांक २९.०४.२०२३ रोजी उघडण्यात आले आहे. निविदेच्या अटी व शर्तीनुसार अपरिवर्तनीय पतपत्र उघडण्याच्या दिनांकापासून १५० दिवसांच्यात आत पुरवठा करणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकाची सर्व माहिती नागरिकांपर्यंत मिळण्याकरिता सदर माहिती मुंबई महानगरपालिका पोर्टलवर टाकण्याबाबत

**(२२) ६२२७० (१२-०५-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरी प्रशासनिक पातळीवर खुल्या माहिती व्यासपीठाचा उद्देश हा महानगरपालिकांच्या कारभारात पारदर्शकता आणणे आणि लोक सहभागाला उत्तेजन देण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल आहे. यात महानगरपालिकाने अत्यंत समजायला, वापरायला सोप्या पोर्टलवर माहिती अद्यावत करणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वंकष माहिती आणि सेवांच्या उपलब्धतेबाबतच्या माहिती जनता आणि शासन यांच्यामधील दरी दूर करण्यासाठी, अशा पोर्टलवर देण्यात येणाऱ्या सेवांच्या स्थितीबाबत अद्ययावत माहिती, अर्थसंकल्पीय तरतूद आणि प्रक्रिया, प्रकल्पांना मंजुरी, चालू प्रकल्प व इतर बाबतची माहितीचा सहभाग असणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेचे खुले माहिती व्यासपीठ हे वापरायला समजायला सोपे, भेदभाव न करणारे, परिपूर्ण, परवानगी ची गरज नसणारे, स्वामित्व नसलेले, सहज उपलब्ध असणारे आणि कोणीही सहज वापरू शकणारे असल्याने खुल्या माहितीचे पालन करते, परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेनेही आपल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे पालिकेच्या सोशल मिडिया खात्याद्वारे थेट प्रक्षेपण सुरु केले आहे. परंतु शासनाने महानगरपालिका पातळीवर ई – गव्हर्नस अंतर्गत खुल्या माहिती व्यासपीठाला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, असल्यास सदर विषयी शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २३.०६.२०१५ व दिनांक ०४.०९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५८ लोकसेवा अधिसूचित करुन महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केल्या आहेत. त्यापैकी नागरिकांना एकूण ५५ सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, उर्वरित ३ सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर ५८ सेवांपैकी ४८ सेवा आपले सरकार पोर्टलवर संलग्नित करण्यात आल्या असून उर्वरित १० सेवा आपले सरकार पोर्टलवर संलग्नित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) खुल्या व्यासपीठाला चालना देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पावले उचलण्यात आली आहेत.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने सद्य:स्थितीत नेमणूक केलेले आय.टी. कंत्राटदारामार्फत समजायला व वापरायला सोप्या पोर्टलवर माहिती अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन एसटी महामंडळाचा उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ बसत नसल्याबाबत

**(२३) ६२४५३ (२५-०४-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन एसटी महामंडळाचे उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ बसत नसल्याने एस.टीचा तोटा दिवसेंदिवस वाढत चालत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, एसटीचे सध्या दिवसाचे उत्पन्न रुपये १३ कोटी ५० लाख असून दिवसाचा खर्च रुपये २५ कोटी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एसटी महामंडळाला तोटयातून बाहेर काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) रा.प.महामंडळाच्या सर्व मार्गांवर वाहतूक वाढविण्यासाठी सर्व विभाग नियंत्रक यांना वारंवार दृकश्राव्य बैठकीद्वारे सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी कामगार कर्तव्यनिहाय उदिष्ट निश्चित करण्यात येत असुन उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

रा.प. महामंडळात स्व:मालकीच्या ७०० बसेसपैकी २५० बसेस सध्या चालनासाठी उपलब्ध झाल्या आहेत. भाडेतत्वारील ५०० साध्या बसेसपैकी १८२ बसेस चालनासाठी व १५० विद्युत बसेसपैकी ३४ बसेस वाहतुकीकरिता महामंडळाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत व उर्वरित बसेस लवकरच दाखल होणार आहेत. भाडेतत्वावरील ५१५० विद्युत बसेस घेण्याबाबत संचालक मंडळाने मंजुरी दिलेली असून निविदेची कार्यवाही झाली आहे व कार्यादेश देण्यात आला आहे.

रा.प.महामंडळाने स्व:मालकीच्या २००० साध्या बसेसकरिता चासिस खरेदी बाबत निविदा प्रक्रिया सुरु आहे. खर्चात काटकसर करण्याकरीता डिझेल, ऑईल व टायरवरील खर्चाबाबत वेळोवेळी आढावा घेऊन सदरच्या खर्चामध्ये बचत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

---

## नेरळ दहिवली (जि.कर्जत) येथील लब्धी गार्डन या गृहप्रकल्पातून सांडपाणी थेट नदीपात्रात सोडल्याबाबत

**(२४) ६२५१४ (२५-०४-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ दहिवली (जि.कर्जत) येथील उल्हास नदीच्या काठावर उभारण्यात येणा-या लब्धी गार्डन या गृहप्रकल्पातून सांडपाणी थेट नदीपात्रात सोडण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सांडपाण्यामुळे स्थानिक ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हास नदी बचाव संघटनेमार्फत अनेक वेळा तक्रारी करुनही कोणतीच दखल घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुंषगाने प्रदुषणास आळा घालण्याकरिता लब्धी गार्डन या गृहप्रकल्पातील संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२४) :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार दि.३१/०१/२०२३ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती.
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, अलिबाग-रायगड यांचेकडून प्रश्नाधीन प्राप्त अहवालानुसार गावात कोणत्याही प्रकारची साथ, उद्रेक झाला नसल्याचे कळविण्यात आले आहे.
(३) व (४) उल्हास नदी बचाव संघटनेमार्फत कोणतीही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेली नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने २५.०२.२०२३ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान उल्हास नदीमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सांडपाणी जात नव्हते. परंतु, सांडपाणी गेल्याच्या खुणा दिसून आल्या असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे दि. २७.०२.२०२३ रोजी लब्धी गार्डन सोसायटीस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तसेच, बांधकाम उद्योजकाने मंडळाने दिलेल्या कारणे दाखवा नोटीसला उत्तर न दिल्यामुळे दि. २७.०६.२०२३ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांवर १२.५ टक्के योजनेंतर्गत झालेला अन्याय दूर करण्याबाबत

**(२५) ६२९९२ (२४-०४-२०२३). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात १२.५ टक्के भूखंड वितरीत करण्याचा निर्णय घेऊनही प्रत्यक्षात प्रकल्पग्रस्ताना ७.८५ टक्के भूखंड सिडकोने वितरीत केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उर्वरित शिल्लक भूखंड प्रकल्पग्रस्तांना वितरीत करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

राज्य शासनाने ज्या शेतक-यांच्या जमिनी नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित केल्या आहेत त्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांना त्यांच्या एकूण संपादित जमिनीच्या १२.५% विकसित भूखंड वाटप करण्याचे शासन निर्णय दि. ६ मार्च, १९९० नुसार धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयात वाटप करण्यात आलेल्या जमिनीपैकी ३०% जमीन सुविधा आणि सुखसोयीसाठी राखून ठेवण्यात यावी अशी तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार ज्या शेतक-यांच्या जमिनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादित केल्या आहेत अशा स्वत:ची जमिन स्वत: कसणा-या प्रकल्पग्रस्त शेतक-यांना १२.५% योजनेंतर्गत देय क्षेत्राच्या ३०% म्हणजेच ३.७५% पायाभूत सुविधा जसे की, रस्ते, खुले उपक्रम तसेच सार्वजनिक उपक्रमांकरिता आणि सामाजिक सुविधांकरिता वापरण्यात येते व उर्वरित ८.७५% क्षेत्राचे प्रत्यक्षात वाटप प्रकल्पग्रस्तांना करण्यात येते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील आगीच्या दुर्घटनेतील जळीत झोपडीधारकास महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी रक्कम प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ६४५८३ (२२-०८-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत झोपडपट्टी विभागात आगीच्या दुर्घटनेनंतर जळीत झोपडीधारकास ५० हजारांची मदत महानगरपालिकेने करावी असा आदेश राज्य शासनाने काढला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु सदरची मदत महानगरपालिकेकडून देण्याबाबत अद्याप कोणताही आदेश वरिष्ठ पातळीवरून प्राप्त झाला नसल्याची माहिती महानगरपालिकेकडून देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील अग्निशमनदलही याबाबत अनभिज्ञ असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असा आदेश आल्यास आगीच्या घटनांमुळे महानगरपालिकेच्या खर्चावर अतिरिक्त भार पडणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईतील आगीच्या दुर्घटनेतील जळीत झोपडीधारकास अनुदानित रक्कम विनाविलंब मिळण्याकरिता शासनाने कोणती ठोस उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१), (२) व (३) महसूल व वन विभागाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन प्रभागामार्फत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिनांक १८.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे :-

• दिनांक ०१.११.२०२२ पासून लागू केलेल्या केंद्र शासनाच्या सुधारित राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाप्रमाणे पडझड / नष्ट झालेल्या १०४१ झोपड्यांकरीता रु.८०००/- प्रति झोपडी या दराने रु.८३.२८ लक्ष इतकी मदत दिनांक १३.०३.२०२३ रोजी आंबेडकरनगर, मालाड येथे लागलेल्या आगीमधील बाधितांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून मंजूर करण्यात येत आहे. या मदतीच्या निधीचे वाटप बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात यावे.

• या आगीतील बाधीतांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी रु.१००००/- इतकी रक्कम स्वतंत्ररित्या मंजूर करण्यात आली आहे. यास्तव, या प्रकरणातील बाधितांना शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या या मदतीवरील खर्चाकरीता, त्यांची झोपडी / घरे पुर्नबांधणीसाठी प्रत्यक्षात झालेला खर्च विचारात घेऊन प्रत्यक्ष खर्च अथवा जास्तीत जास्त रु. ५००००/- प्रति व्यक्ती या मर्यादेत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन निधीमधून आवश्यकतेनुसार मदत देण्यात यावी.

त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दिनांक १८.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये रु. २,१४,७१,०००/- व दिनांक २८.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये रु. २,०१,६९,०००/- ची मागणी केली आहे.

(४) हे खरे आहे.

(५) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने रु.४,१६,४०,०००/- एवढा निधी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना स्थानांतरीत केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा विभागातील प्रमुख अभियंत्यांची**
**५० ते १०० टक्के पदे रिक्त असल्याबाबत**

**(२७) ६४५८४ (२४-०८-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये प्रमुख अभियंत्यांची जागा १०० टक्के रिक्त असून कनिष्ठ अभियंत्यांच्या ५० टक्के जागा रिक्त असल्याची माहिती माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ष २०२० ते २०२२ या कालावधीत सहायक कार्यकारी अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांची संख्या ३५ टक्क्याहून ७६ टक्क्यांपर्यंत वाढली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घनकचऱ्यांचे व्यवस्थापन आणि विल्हेवाटीसाठी कचरा निर्मितीची नियमित माहिती गोळा करण्यासाठी कोणतीही रचना नसून त्यामुळे अनेक विभागात निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या माहितीमध्ये विसंगती होत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेत अनेक वर्ष विविध विभागातील पदे रिक्त असून ती भरली जात नसल्याने त्याचा परिणाम मुंबईकरांना मिळणाऱ्या सेवावर होत असल्याचे आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईसारख्या आंतराष्ट्रीय शहर स्वछ व सुशोभित राखण्यासाठी घनकचरा विभागातील प्रमुख अभियंत्याची पदे तातडीने भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) व प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) प्रकल्प ही दोन्ही पदे रिक्त आहेत. तथापि सदर दोन्ही पदांचा कार्यभार उप प्रमुख अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे.

तसेच, कनिष्ठ अभियंत्यांच्या ३६ पदांपैकी १९ पदे रिक्त आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये "सहाय्यक कार्यकारी अधिकारी" हे पद अस्तित्वात नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घनकचऱ्याचे व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्यासाठी कार्यरत प्रणालीमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन माहिती प्राप्त करण्यावर भर देण्यात येतो. त्यामध्ये कचऱ्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस प्रणाली कार्यरत आहे. त्यामुळे वाहनांचे सटीक स्थान माहिती होण्यास मदत होते. तसेच सर्व वाहनांवरील व्हीटीएमएस (व्हेहीकल ट्रॅकिंग) प्रणालीमुळे वाहनांच्या फेऱ्यांचे निश्चित मार्ग कळण्यास मदत होते. तसेच सदर वाहन डम्पिंगला आल्यानंतर त्या गाडीची Weigh Bridge प्रणालीने मोजणी केली जाते. डब्ल्यू.एम.एस. प्रणालीमध्ये कचऱ्याची माहिती (वजन) ठरविण्याचे काम करण्यात येते. संगणीकृत माहिती संकलित केल्यामुळे सदर माहिती अचूक असते. त्यामुळे कचऱ्याच्या गाड्यांची व त्यामधून वाहून नेणाऱ्या कचऱ्याच्या माहितीमध्ये विसंगती आढळून येत नाही.

(४) सेवांवर परिणाम होऊ नये याकरिता एन.जी.ओ. च्या मदतीने कंत्राटी कामगारांची मदत घेऊन मुंबईकरांना सेवा देण्यात येत आहे.

(५) प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) व प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) प्रकल्प ही पदे "उप प्रमुख अभियंता" या संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येतात. तथापि "प्रमुख अभियंता" या पदाकरिता आवश्यक असलेल्या २ वर्षांच्या अनुभवाची अट कार्यरत उप प्रमुख अभियंता माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये पूर्ण करीत आहेत. सबब सदर दोन्ही पदे भरण्यात आलेली नाहीत.

---

## मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या आरोग्य विषयक समस्या लक्षात घेऊन अत्याधुनिक साधने पुरविण्याबाबत

**(२८) ६४५८९ (२४-०८-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत घरातील सांडपाण्यापासून शौचालयातील घाणीपर्यंत सर्वच वाहिन्या नाल्यात सोडल्या जात असताना मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगार कोणत्याही संरक्षक साधनांशिवाय गाळात उतरून सफाई करताना दिसत असून, मॅनहोलची स्वच्छता करणाऱ्या किंवा सिव्हरेज लाईनमधील गाळ काढणाऱ्या कामगारांच्या मृत्यूची आकडेवारी सातत्याने वाढत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालवणी, गोवंडी, घाटकोपर आणखी विविध प्रभागात छातीपर्यंत उंच असलेल्या गटारात उतरलेले कामगार हाताने घमेल्यात गाळ भरून काढताना दिसत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गटारांमध्ये जाऊन साफसफाई करताना अनेक सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याने गटारात किंवा अरुंद अशा नाल्यात साफसफाई अशा प्रकारच्या नोकऱ्यांवर मॅन्युअल स्कॅव्हेंजर अॅण्ड द रीहॅबिलिटेशन अॅक्ट, २०१३ नुसार अशा प्रकारच्या नोकऱ्यांवर बंदी असताना गटारे आणि सेप्टिक टँकची स्वच्छता अजूनही कामगारांकडून करून घेतली जात असून, त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कचऱ्याचे विलगीकरण, गटारांची स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, यांत्रिकीकरण, ऑटोमेशन, कचरा व्यवस्थापन प्रणालीचा फेरआढावा, गटार व मॅनहोल्स सफाईमध्ये नवीन तंत्रज्ञान आणि मशीन्स आणणे, अर्थसंकल्पात मोठी आर्थिक तरतूद करणे, यांत्रिक, स्वयंचलित सुरक्षित प्रणाली, प्रशिक्षण व सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर खर्च करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक अनुदान, यासाठी सर्वसमावेश धोरण तज्ज्ञांच्या सल्ल्याने तयार करावे, अशी मागणी तत्कालीन विरोधी पक्ष नेते, विधान सभा यांनी देखील शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने मुंबईतील सफाई कामगारांच्या आरोग्याची समस्या लक्षात घेता त्यांना अत्याधुनिक साधने पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालने विभागातील वाहनविराजित यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने (यांत्रिक पध्दतीने) मलनि:सारण वाहिन्यांचे परिरक्षण करण्यात येते.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील सफाई कामगार शौचालयातील सांडपाणी वाहण्याची स्वच्छता करीत नाहीत.

(२) व (३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागामार्फत मोठ्या नाल्यांची सफाई कंत्राटदारामार्फत प्रामुख्याने यंत्रसामुग्रीचा वापर करुन करण्यात येते. तसेच यंत्रसामुग्रीचा वापर करता येणे शक्य नाही अशा नाल्यांची सफाई कंत्राटदारमार्फत नियुक्त केलेल्या कामगारांच्या सहाय्याने करण्यात येते व त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व प्रकारची साधने देण्यात आलेली आहेत. अशाप्रकारे सुरक्षा साधनांचा वापर करुन कामगारांमार्फत सुरक्षितरित्या नाल्यांची साफसफाई करण्यात येते.

गटारांची स्वच्छता करणे तसेच घनकचरा व्यवस्थापन परिवहन विभागामार्फत सेफ्टीक टँकच्या स्वच्छतेकरिता संयंत्र लावलेली वाहने विभागीय सहायक अभियंता (परिरक्षण) यांचेकडे कार्यक्रम आखण्याकरिता पाठविली जातात.

खाजगी गृहनिर्माण संस्थेच्या सेफ्टीक टँकची सफाई घन कचरा व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात येत नाही.

(४) हे खरे आहे.

आर्थिक तरतुदीद्वारे नवीन तंत्रज्ञानावर आधारीत अद्ययावत यंत्रणे खरेदी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन विभागामार्फत मलवाहिन्यांची स्वच्छता केली जाते.

कचऱ्याचे विलगीकरण, १०० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे, यांत्रिकीकरण, ऑटोमेशन, कचरा व्यवस्थापन प्रणालीचा फेरआढावा, रस्ते सफाईमध्ये नवीन तंत्रज्ञान आणि मशीन्स आणणे, यांत्रिक, स्वयंचलित सुरक्षित प्रणाली, प्रशिक्षण व सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर खर्च करणे या बाबी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या व्हिजन २०३० अंतर्गत विचाराधीन आहेत.

(५) नालेसफाईच्या कंत्राटात कामगारांना नालेसफाई करताना आवश्यक ती सुरक्षा साधने पुरविण्याची अंट कंत्राटात समाविष्ट असते व त्यानुसार सदर अटींचे पालन करण्यात येते.

तसेच अत्याधुनिक साधने वापरुन मलवाहिन्यांची स्वच्छता केली जाते. त्याचबरोबर कामगारांना सुरक्षिततेची साधने दिली जातात.

मुंबईतील सफाई कामगारांना सफाईचे काम करण्याकरिता मास्क, परावर्तित जॅकेट, हातमोजे, गमबुट, सॅनिटायझर, साबण इत्यादी सुरक्षा साधने वेळोवेळी पुरविण्यात येतात. तसेच वर्षातून दोन वेळा सफाई कामगारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात विभागवार आरोग्य तपासणी करुन उपचार केले जातात. तसेच त्यांच्याकरिता कुटुंब आरोग्य विमाच्या रकमेची प्रतिपूर्ती केली जाते.

---

**मुंबई महानगरपालिकेतील उद्यान, मनोरंजन मैदान व मोकळ्या जागेची देखभाल करण्याकरिता राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याबाबत**

**(२९) ६४७४८ (२७-०८-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील उद्यान, मनोरंजन मैदान व मोकळ्या जागेची देखभाल करण्याकरिता महानगरपालिकेने तब्बल १३८ कोटी रुपयांच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार केले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही कंत्राटदारानी पालिका अधिकाऱ्यांशी संगनमत करून ३० ते ४१ टक्के कमी दराने काम करण्याची तयारी दर्शवून अंदाजित १०० रुपयांचे काम ५९ रुपयाला करण्यात येणार असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गैरकारभारामुळे मुंबईतील उद्यानांचा दर्जा खालावणार असल्याने उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईकरांची फसवणूक करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत मुंबई शहर व उपनगरातील उद्याने, मनोरंजन मैदाने, मोकळ्या जागा, वाहतूक बेटे व रस्ता दुभाजक इ. सुमारे १११६ भूभागांचे परिरक्षण करण्याकरिता माहे जानेवारी, २०२३ ते एप्रिल, २०२३ या दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत परिमंडळनिहाय निविदा मागवून रु. १४९ कोटी रकमेच्या परिरक्षण कामाकरिता कंत्राटदारांची २४ विभागांकरिता विभागनिहाय १ वर्ष ०६ महिने इतक्या कालावधीकरिता नेमणूक करण्यात आली आहे.

(२) सदर निविदेमध्ये कंत्राटदारांनी कमाल उणे १४% ते किमान उणे ४१.२०% व सरासरी उणे ३०.०८% इतक्या दराने काम घेतले आहे. याबाबत नियुक्त कंत्राटदारांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या संसाधनेच्या अनुषंगाने विश्लेषण दरसूची सादर केली असून, उद्यान विभागामार्फत महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार परिरक्षण कामे करुन घेण्यात येत आहेत.

(३) सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नसून, मुंबईतील उद्यानांच्या परिरक्षण कामाची उद्यान विभागामार्फत नियमित पाहणी करण्यात येते. मुंबईतील उद्यानांचा दर्जा खालावणार नाही याची दक्षता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दक्षता घेण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### समुद्राच्या पाण्याचे निःक्षारीकरण करण्याच्या प्रकल्पाबाबत

**(३०) ६४७९० (२२-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भविष्यात पाण्याच्या संकटाचा सामना करण्यासाठी समुद्राच्या पाण्याचे निःक्षारीकरण करण्याच्या प्रकल्पाला चालना मिळत असताना गोराई येथील स्थानिक मच्छीमारांनी या प्रकल्पावर आक्षेप घेतला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू, पालघर, ठाणे, मुंबई, रायगड या जिल्ह्यांमधील मच्छीमारांच्या उपजीविकेवर त्याचा परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किनाऱ्यावरील सांडपाण्यामुळे, मलमूत्र मिश्रित पाण्यामुळे पाण्याची गुणवत्ता खराब झालेली असताना अशा परिस्थितीत आरोग्यपूर्णतेचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समुद्राच्या पाण्याचे निःक्षारीकरण करण्याच्या प्रकल्पावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन विभागांतर्गत ८ मलजल प्रक्रिया केंद्रे असून, सदर केंद्रांवर येणाऱ्या मलजलावर प्रक्रिया करुन ते समुद्रात सोडले जाते.

(४) सदर प्रकल्पासाठी पर्यावरणीय परिणाम निर्धारण अभ्यास, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, किनारपट्टी नियमन क्षेत्र अभ्यास करण्यात आला असून सर्व वैधानिक परवानग्या प्राप्त करुन, निविदा मागवून प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुलुंड येथील श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालयाचे बोगस डॉक्टरांनी रुग्णांचा घेतलेला बळी

**(३१) ६४८५१ (२५-०८-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुलुंड येथील श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालयाचे बोगस डॉक्टर यांनी रुग्णाचे बळी घेत असल्याचा धक्कादायक प्रकार माहितीच्या अधिकारातून मागविलेल्या माहितीव्दारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीवनज्योत चॅरीटेबल ट्रस्टमार्फत पालिकेच्या म.तु.अगरवाल रुग्णालयाला बोगस डॉक्टर पुरविण्यात येत असून गेल्या १० महिन्यामध्ये या रुग्णालयातील आयसीयू विभागात तब्बल १४९ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलुंड कॉलनीत गोल्डी शर्मा यांनी या ट्रस्टविरुद्ध दाखल केलेल्या पोलीस तक्रारीतून एकापेक्षा एक खळबळजनक बाबी समोर आल्या आहेत. डॉ. परवेज शेख अजीज, डॉ. अविनाश प्रसाद आणि डॉ. राजेश या तीन डॉक्टरांनी या ट्रस्टमार्फत अगरवाल रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात काम केले असल्याची माहिती गोल्डी यांना मिळाली, मात्र यातील डॉ. परवेज शेख अजीज यांच्याविरोधात मालवणी पोलीस ठाण्यात बोगस डॉक्टर असल्यासंदर्भात तर, ठाणे कोव्हिड हॉस्पिटल येथे कोव्हिड रुग्ण उपचारासाठी दाखल करताना भ्रष्टाचार करून रुग्ण दाखल करून घेतल्याचा कापुरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे समोर आले, तर नोंदणीपत्रावरील वैद्यकीय अधिकारी व

उपचार करणारे डॉक्टर वेगळेच असल्याची माहितीही मिळाल्याने हा बोगस डॉक्टरांचा आकडा मोठा असल्याची शक्यता गोल्डी यांनी वर्तवली असून अशा सर्व डॉक्टरांनी किती रुग्णावर उपचार केले, यापैकी किती रुग्णाचा जीव दगावला यांचा देखील तपास होणे आवश्यक आहे अशी मागणीही श्री.गोल्डी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जीवनज्योत चॅरीटेबल ट्रस्ट संस्थेचे ट्रस्टी वीरेंद्र यादव, ज्योती ठक्कर, जे.सी.वकील, रतनलाल जैन आणि दीप्ती मेहता हे असून संस्थेला मुंबई महानगरपालिकेने शासकीय रुग्णालयातील आयसीयू विभागात तीन शिफ्टसाठी डॉक्टर पुरविण्याचे कंत्राट दिले आहे व त्यासाठी दिनांक १७ मे, २०१८ ते १६ मे, २०२० या कालावधीत ट्रस्टला ८ कोटी ८३ लाख ३० हजार रुपयांची रक्कम मोबदला म्हणून देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जीवनज्योत चॅरीटेबल ट्रस्ट मार्फत नेमणूक करण्यात आलेले डॉक्टर हे योग्य पदवीधर आहेत की नाही याची माहिती गोल्डी यांनी माहिती अधिकारात मागितली असता, योग्य व समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. ट्रस्टमार्फत नेमणूक करण्यात आलेले डॉक्टर बनावट प्रमाणपत्रे देऊन येथे नेमण्यात आले त्यामुळेच रुग्णाचे जीव जात असल्याचे समजल्यामुळे अखेर श्री.गोल्डी यांनी संबंधीत काही शासकीय कार्यालयाकडे तक्रारी दिल्या असता, सदर प्रकरणी आजतागायत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणासंदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत दिनांक १७.०५.२०१८ पासून मुलुंड (प) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालयातील अतिदक्षता विभागात तीन सत्रामध्ये केवळ इंटेन्सिव्हिस्ट डॉक्टरांच्या सेवा घेण्यात आल्या. सदर संस्थेने अतिदक्षता विभागात प्रत्येक सत्रामध्ये एक पदवीधर एमबीबीएस डॉक्टर आणि एक पदव्युत्तर पदवी किंवा पदविकाधारक डॉक्टर देणे अपेक्षित होते.

अतिदक्षता विभागामध्ये गंभीर तसेच अतिगंभीर रुग्ण दाखल होतात. सदर विभागामध्ये गेल्या दहा महिन्यांत एकूण १३४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(३) डॉ. परवेज शेख अजित, डॉ. अविनाश प्रसाद व डॉ. राजेश या तीन डॉक्टरांनी जीवनज्योत चॅरिटेबल ट्रस्टमार्फत म.तु. अगरवाल रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात काम केले आहे, हे खरे आहे.

मुलुंड कॉलनी येथे राहणारे श्री. गोल्डी शर्मा यांनी जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्टविरुध्द मुलुंड पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असून, सदर प्रकरणी पोलीसांमार्फत तपास कार्य सुरु आहे.

सदर तपास कामासंबंधीत म.तु. अगरवाल रुणालयाच्या अतिदक्षता विभागाबाबतची माहिती पोलीसांनी मुलुंड पोलीसांनी मागितली असून, त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्टने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये दिनांक १७.०५.२०१८ ते दिनांक १६.०५.२०२० या कालावधीत दिलेल्या सेवेकरिता त्यांना महानगरपालिकेमार्फत रु. १२,२९,७५,९००/- इतक्या रकमेचे अधिदान देण्यात आले आहे.

(५) श्री. गोल्डी शर्मा यांनी माहितीच्या अधिकारात मागविलेली उपलब्ध माहिती त्यांना महानगरपालिकेमार्फत देण्यात आली आहे.

(६) जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट यांनी श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालयातील अतिदक्षता विभागात प्रत्येक सत्रामध्ये एक पदवीधर एमबीबीएस डॉक्टर आणि एक पदव्युत्तर पदवी किंवा पदविकाधारक डॉक्टर देणे अपेक्षित होते. यामध्ये अनियमितता आढळून आल्यामुळे महानगरपालिकेने संस्थेकडून रु. ५,१३,०००/- इतका दंड वसूल केला आहे.

श्री. गोल्डी शर्मा यांनी जीवन ज्योत ट्रस्टविरुद्ध मुलुंड पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. त्यानुषंगाने मुलुंड पोलीस ठाणेमार्फत श्रीमती म.तु अगरवाल रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाबाबत माहिती मागवली होती. सदर माहिती महानगरपालिकेमार्फत मुलुंड पोलिस ठाण्याला उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत, महानगरपालिकेमार्फत जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सेवा खंडित करुन त्यांना दिनांक ०५.०७.२०२३ पासून ३ वर्षाकरीता काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

---

## मुंबई-ठाणे महानगरपालिका हद्दीतील बांधकामाच्या ठिकाणी निर्माण होणारा राडारोडा मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या कडेला टाकला जात असल्याबाबत

**(३२) ६४८८९ (२८-०८-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-ठाणे महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाने खाडी परिसर तसेच कचरा भूमीवर राडारोडा व बांधकामाचा अन्य कचरा टाकण्यांवर निर्बंध घातल्यामुळे मुंबई ठाण्यातून येणारे राडारोडाचे डंपर रात्रीच्यावेळी मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मनोर, वरई फाटा, कुडे गावच्या हद्दीत तसेच, स्थानिक आदिवासींच्या वनजमीनीवर टाकत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत दुतर्फा राडारोडा टाकला जात असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून महामार्गावर धुळीचे लोट पसरत असून, महामार्गाची देखील बिकट अवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात इतरत्र कुठेही राडारोडा व बांधकामाचा अन्य कचरा पडू नये याकरिता सुनिश्चित ठिकाणांवर व देवनार क्षेपणभूमी येथे राडारोडा / बांधकामाचा अन्य कचरा टाकण्यासाठी परवानगी देण्यात येते. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अंदाजे महिन्याला १२०० मे. टन राडारोडा देवनार क्षेपणभूमी येथे अंदाजे महिन्याला ३५०० मे. टन सुनिश्चित केलेल्या ठिकाणांवर टाकण्यात येतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात इतरत्र कुठेही राडारोडा व बांधकामाचा अन्य कचरा टाकण्यास मज्जाव करण्यात आला आहे. राडारोडा व बांधकामाचा अन्य कचरा इतरत्र टाकणाऱ्या उपद्रवी व्यक्तींवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपद्रव शोधकांमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येते. तसेच अशा उपद्रवी व्यक्तींबाबत स्थानिक पोलिसांना अवगत करुन एफ.आय.आर. नोंदवून उचित कारवाई करण्यात येते.

राडारोडा व बांधकामाचा अन्य कचरा इतरत्र पडू नये याकरिता सर्वसामान्य जनतेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत “Call on Debris Scheme” राबविली जाते. सदर योजनेत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शुल्क आकारुन राडारोडा व बांधकामाचा अन्य कचरा उचलण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुर्ला मुंबई येथील भंगार, अल्युमिनियम जळणाऱ्या आणि धुरास कारणीभूत ठरणाऱ्या बेकायदा कारखान्याना महानगरपालिकेने नोंटीस बजाविल्याबाबत

**(३३) ६५१३१ (२८-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला येथील भंगार, अल्युमिनियम जळणाऱ्या आणि धुरास कारणीभूत ठरणाऱ्या बेकायदा २० ते २२ कारखान्याना महानगरपालिकेने दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यादरम्यान नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखाने ४८ तासात मालकांनी स्वतःहून बंद करावा अन्यथा महानगरपालिका कारवाई करून बंद करण्यात येतील असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळणाऱ्या कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) सदर कारखान्यांना दिनांक ३ व ५ एप्रिल, २०२३ रोजी नोटीस बजावण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी धूर निर्माण करणाऱ्या कारखान्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थळनिरीक्षण करुन अनधिकृत कारखान्यांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३९० नुसार कारवाई करण्यात आली असून, त्यांचेवर मा. न्यायालयामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच अनधिकृत धूर निर्माण करणाऱ्या भट्ट्या व लॉण्ड्रीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
तसेच सदर धुरातून होणाऱ्या प्रदुषणाबाबतच्या कार्यवाहीकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित येत असलेल्या सेव्हन हिल्स रुग्णालयात (अंधेरी) ''महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना'' सुरु करण्याबाबत**

**(३४) ६५३७४ (२५-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित येत असलेल्या सेव्हन हिल्स रुग्णालयात (अंधेरी) ''महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना'' सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच रुग्णालयातील कॅन्सर रुग्णांवरील उपचारासाठी उपयुक्त असे ''लिनीअर एक्सीलरेटर''मशीन दुरुस्त करुन तात्काळ कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सेव्हन हिल्स रुग्णालयात महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यांतून विविध व्याधीवर उपचार घेण्याकरिता गोरगरिब रुग्ण येत असून, सदरहू रुग्णालयात ''महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना'' नसल्याने गरीब व सर्वसामान्य रुग्ण या योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजना उपरोक्त रुग्णालयात विशेष बाब म्हणून तात्काळ सुरु करण्याबाबत तसेच ''लिनीअर एक्सीलरेटर'' मशीन कार्यान्वित करण्याकरिता निधीची तरतुद करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
सद्य:स्थितीत सेव्हन हिल्स रुग्णालयात ''महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना'' सुरु नसली तरी पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक रुग्णांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दरांनुसार उपचार व्यवस्था उपलबध आहे.
(४) सद्य:स्थितीत इन्सॉलव्हन्सी व बँकरप्टसी कोड २०१६ अंतर्गत सेव्हन हिल्स रुग्णालयाचे प्रचालन करणाऱ्या मे. सेव्हन हिल्स हेल्थ केअर प्रा.लि. या कंपनीच्या दिवाळखोरी संबंधातील दावा नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल यांच्याकडे प्रलंबित आहे.

सेव्हन हिल्स रुग्णालयाचे एम्पॅनेलमेंट झाल्यानंतर त्वरीत "महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना" कार्यान्वित करण्यात येणार आहे.

सेव्हन हिल्स हेल्थ केअर प्रा.लि. यांच्या सीआयआरपीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सेव्हन हिल्स रुग्णालयातील "लिनिअर एक्सीलरेटर" मशीन कार्यान्वित करण्याकरिता निधीची तरतूद करावी किंवा कसे याचा निर्णय घेणे उचित असणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वर्सोवा-अंधेरी शहाजी राजे क्रीडा संकुल येथे सुरु असलेल्या गैरकारभाराबाबत

**(३५) ६५५०४ (२५-०८-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वर्सोवा येथील मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे "शहाजी राजे क्रीडा संकुल" (अंधेरी स्पोर्ट्‌ क्लब) हे सन १९८८ मध्ये "नो लॉस लो प्रॉफिट" या तत्वावर मेसर्स ललित कला प्रतिष्ठान या खाजगी संस्थेस चालविण्यास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कला प्रतिष्ठान मार्फत विविध खेळ बंद करण्यात येऊन खेळाडूंसाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नसणे, नियमांचे उल्लंघन करुन लग्न समारंभ, राजकीय कार्यक्रम यातून पैसे घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बाहेरुन येणाऱ्या खेळाडूंकरिता निवासासाठी ५६ रुमचे वसतीगृहाचे थ्री स्टार हॉटेल बनविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, तसेच क्रीडा संकुलात ज्येष्ठ नागरिकांसाठी मॉर्निंग वॉकसाठी केवळ सात ते साडेआठ एवढीच वेळ ठेवली असून संकुलातील तरणतलावाचीही दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानगरपालिकेच्या १४ एकर जागेवरील क्रीडा संकुलाचे संबंधितांकडून उपरोक्तप्रमाणे खाजगीकरण करून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सदर गैरव्यवहाराप्रकरणी संबंधितांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही. बृहन्मुंबई क्रिडा आणि ललितकला प्रतिष्ठान ही खाजगी संस्था नसून बृहन्मुंबई महानगरपालिकेचा न्यास / उपक्रम आहे.

(२) शहाजी राजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी येथे खेळाडूंसाठी विविध सुखसोयी उपलब्ध असून खेळ बंद नाहीत. सदर ठिकाणी जलतरण, बॅडमिंटन, टेबल टेनिस, स्क्वॉश, व्यायामशाळा, लॉन टेनिस, फुटबॉल, जिम्नॅस्टिक, स्केटींग, क्रिकेट, योगा, रायफल शुटींग, कराटे, जॉगिंग इत्यादी खेळ सुरु आहेत.

बृहन्मुंबई क्रिडा आणि ललितकला प्रतिष्ठानच्या व्यवस्थापनाच्या विविध खर्चाचा ताळमेळ भागविण्यासाठी लग्न समारंभातून उपलब्ध झालेला निधी वापरात येतो आणि ही प्रथा सुरुवातीपासून सुरु आहे. सदर ठिकाणी राजकीय कार्यक्रम होत नाहीत.

(३) शहाजी राजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी येथे ५६ खोल्यांचे खेळाडू वसतीगृह आहे. त्यापैकी २८ खोल्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन पथक यांना रहिवासासाठी देण्यात आल्या आहेत. उर्वरित २८ खोल्या मे. यु.एम.आर.बी. या संस्थेस प्राधान्याने आरक्षण देण्याच्या अटीवर भाडे तत्वावर दिल्या आहेत.

तथापि सदर खोल्यांचा हॉटेलच्या व्यावसायिक वापरासाठी उपयोग होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मे. यु.एम.आर.बी. यांना दिलेली परवानगी रद्द करण्याबाबत नोटीस देण्यात आली असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया अवलंबिली जात आहे.

(४) शहाजी राजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी जॉगिंगची वेळ सकाळी ६ ते ८.३० व संध्याकाळी ५.३० ते ७.३० अशी पूर्वीपासून आहे. सदर वेळ सकाळी ६ ते ९.३० व संध्याकाळी ५ ते ८.३० अशी वाढविण्यात आली आहे.

शहाजी राजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी येथे ऑलम्पिक साईजचा जलतरण तलाव असून त्याच्या मोठ्या संरचनात्मक दुरुस्तीचे कामाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा प्रसारीत करण्यात येणार आहे. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काम पूर्ण झाल्यावर सदर जलतरण तलाव पुन:श्च सुसज्जपणे कार्यरत होणार आहे.

(५) हे खरे नाही. शहाजी राजे भोसले क्रिडा संकुलाचे खाजगीकरण झालेले नसून कुठलाही गैरव्यवहार झालेला निदर्शनास आलेला नाही.

(६) बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर शहाजी राजे भोसले क्रिडा संकुलाची चौकशी करण्यात आली असून त्याच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

---

**मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मनपा ट्रॉमा केअर रुग्णालयातील कंत्राटी कामगारांना वेतन मिळत नसल्याबाबत**

**(३६) ६५६०७ (२८-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महानगरपालिका ट्रॉमा केअर रुग्णालयातील कंत्राटी कामगारांना नियमितपणे वेतन मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मनपा ट्रॉमा केअर रुग्णालयातील प्रशासनाचा भोंगळ कारभार सुरु असल्याने कंत्राटी कामगारांवर उपासमारीचे संकट ओढवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी कामगारांची नियुक्त करणारा नियुक्त कंत्राटदारांनी या कंत्राटी कामगारांचे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेचे पैसे भरत नसल्याने कामगारांना या सुविधांपासून वंचित रहावे लागेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंत्राटी कामगारांना नियमित वेतन न मिळण्यामागची कारणे काय आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) कंत्राटी कामगारांना वेतन देणे हे करारातील अटी व शर्तींनुसार बहुउद्देशीय कामगार पुरविणाऱ्या मे. केअर वन सोल्युशन व रुग्णालयीन साफसफाई कामगार पुरविणाऱ्या मे. के.एच.एफ.एम. या कंत्राटदारांची जबाबदारी आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मे. के.एच.एफ.एम. या कंत्राटदाराने माहे जानेवारी, २०२३ पासून भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेचे पैसे भरत असल्याची पावती जमा केली आहे.

तथापि बहुउद्देशीय कामगारांची सेवा पुरविणाऱ्या मे. केअर वन सोल्युशन या कंत्राटदाराने कामगारांचे भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेच्या पैशांचा भरणा न केल्यामुळे सदर कंत्राटदाराच्या प्रत्येक महिन्याच्या देयकातून १०% रक्कम राखून ठेवण्यात आली आहे. सदर कंत्राटदाराने कामगारांना भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेची रक्कम न दिल्यास राखून ठेवलेल्या १०% रक्कमेतून भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेची रक्कम अदा करण्याची तरतूद करण्यात येणार आहे.

(४) सदर कंत्राटी कामगारांना माहे सप्टेंबर, २०२३ पर्यंत वेतन देण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जोगेश्वरी (मुंबई) राजेश्वर रागिनवार स्मशानभूमीचा भूखंड मनपाने ताब्यात घेऊन वास्तव्यास असलेल्या कुटुंबियांचे अन्यत्र स्थलांतर करण्याबाबत

**(३७) ६५६०८ (२८-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील राजेश्वर रागिनवार स्मशानभूमीत वास्तव्यास असलेली ८२ कुटुंबियांपैकी ४० कुटंबियांचे अन्यत्र स्थलांतर करण्यात आले असून उर्वरित ४२ कुटुंबियांचे अदयाप स्थलांतर झालेले नसल्याचे माहे एपिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ४२ कुटुंबियांचे स्थलांतर होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन स्मशानभुमीचा भूखंड मनपाच्या ताब्यात घेऊन कुटुंबियांचे स्थलांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रतापनगर हिंदू स्मशानभूमीच्या आरक्षित असलेल्या जागेच्या अधिग्रहणाची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. तसेच तेथील ४२ झोपडीधारकांच्या पुनर्वसनाकरिता त्यांना पीएपी (पर्यायी सदनिका) उपलब्ध करुन देण्याकरिता एमएमआरडीए व एसआरए प्राधिकरणास विनंती करण्यात आली आहे.

त्यानुसार सदर आरक्षित भूखंडाचे अधिग्रहण झाल्यानंतर व एमएमआरडीए किंवा एसआरए प्राधिकरणाकडून पर्यायी सदनिका प्राप्त झाल्यानंतर सदर जागेवरील ४२ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

(३) अस्तित्वातील राजेश्वर रागीनवार स्मशानभूमीला लागून असलेल्या न.भू.क्र. २२७ (भाग), २२१, २३०, २३२ (भाग), २३१ व २३३ (भाग) या स्मशानभूमीकरिता आरक्षित असलेल्या व ४९५९.३ चौ.मी. इतके क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचे भूसंपादन सुरु असून, भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर) यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे.

भूसंपादनाच्या ३०% रकमेचा भरणा उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगरे यांच्याकडे दिनांक ०८.०१.२०१८ रोजी करण्यात आला असून, सदर जमिनीचा ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत होणे अद्यापि बाकी आहे.

सदर जमिनीचा ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करण्याबाबत तसेच भूसंपादन प्रकरणी निवाडा जाहीर करणेबाबत जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर) व उपविभागीय अधिकारी (पश्चिम उपनगरे) यांना विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जोगेश्वरी (पूर्व) परिसरातील रस्त्यांवर तसेच फुटपाथवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(३८) ६५६११ (३१-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील पुनमनगर, तक्षशिला, महाकाली व मजास डेपो या परिसरातील रस्त्यांवर तसेच फुटपाथवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ मे, २०२३ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू फुटपाथवर गॅरेजेस टाकण्यात आलेली असून खाद्यपदार्थांची दुकानेही टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फुटपाथवर अनधिकृतपणे खाद्यपदार्थांची दुकाने टाकण्यात आल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरुन चालावे लागत आहे त्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत फेरीवाल्यासंदर्भात तसेच फुटपाथवरील दुकाने तात्काळ हटविण्याबाबत शासन स्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात गॅरेज व खाद्यपदार्थांची दुकाने लावण्यात येतात हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) जोगेश्वरी (पूर्व) येथील महाकाली, तक्षशीला, पूनम नगर, मजास डेपो या परिसरातील फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सकाळ व संध्याकाळ सत्रात वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे.

सदर ठिकाणी माहे मे, २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत ३३ वेळा अनधिकृत फेरीवाल्यांवर अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदर ठिकाणच्या तात्पुरत्या स्वरुपातील अनधिकृत गॅरेज, खाद्यपदार्थांची दुकाने अनधिकृत फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील गोरेगांव पूर्व फिल्मसिटी रोडलगत महानगरपालिकेच्या भुखंडावरील उद्यान खाजगी संस्थाना दिल्याबाबत**

**(३९) ६५६५२ (२५-०८-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील गोरेगांव पूर्व फिल्मसिटी रोडलगत महानगरपालिकेच्या भुखंडावर सुमारे साडे सात कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले आरे भास्कर उद्यान खाजगी संस्थाना दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उद्यान खासगी योगा, झुम्बा डांससाठी देत असताना महानगरपालिकेचा कोणताही वचक या महानगरपालिकेच्या उद्यानावर नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्यान दुरुस्तीच्या नावाखाली बोर्ड लावून नागरिकांना प्रवेश बंदी केली जात असून, दुरुस्ती न करताच उक्त उद्यान चित्रिकरणासाठी भाडेतत्वांवर दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई महानगरपालिका शहरातील उद्याने व क्रिडांगण खासगी संस्थांच्या ताब्यातून पुन्हा आपल्या ताब्यात घेणार होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील उद्याने व क्रिडांगण खासगी संस्थांच्या ताब्यातून सोडवण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदर उद्यान सन २००३ ते २००८ या कालावधीत मे. आरे भास्कर स्पोर्टस ॲण्ड वेल्फेअर सेंटर यांना विकास व परिरक्षणाकरिता तत्कालीन दत्तक धोरणानुसार हस्तांतरीत करण्यात आले होते. त्यानुसार संबंधित संस्थेमार्फत सदर उद्यानाचा विकास करण्यात आला होता.

सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या नवीन परिरक्षण धोरणानुसार सदर भूखंड मे. आरे भास्कर स्पोर्टस ॲण्ड वेल्फेअर सेंटर यांना ११ महिन्यांच्या कालावधीकरिता दिनांक १४.०२.२०२२ रोजी परिरक्षणाकरिता हस्तांतरीत करण्यात आला होता. सदर कालावधी दिनांक १३.०१.२०२३ रोजी संपुष्टात आला असून, परवानगीचे नुतनीकरण करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी राज्य मानवी हक्क आयोगाने स्वाधिकाराने दिनांक ३१.०३.२०२३ रोजी दखल घेतली होती. त्याअनुषंगाने सदर उद्यान कोणत्याही खाजगी योगा, झुम्बा डान्ससाठी देत असल्याचे आढळून न आल्याने, राज्य मानवी हक्क आयोगाच्या दिनांक ०७.०६.२०२३ रोजीच्या निकालानुसार सदर प्रकरण बंद करण्यात आले आहे.

(३) अशी कोणतीही बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण २१६ भूखंड दत्तक तत्वावर व ९ भूखंड काळजीवाहू धोरणानुसार विविध संस्थांना विकास व परिरक्षणाकरिता देण्यात आले होते. तथापि तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार दत्तक तत्व धोरणानुसार देण्यात आलेल्या भूखंडापैकी एकूण १९१ भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ताब्यात घेण्यात आले आहेत.

(५) सदर प्रकरणी अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) यांच्या अध्यक्षतेखाली नवीन धोरण तयार करण्याकरिता समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने उद्याने/मैदाने दत्तक तत्वावर देण्याबाबतचे धोरण निश्चित केल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## मुंबईमधील दादर (पश्चिम) येथील एका टॉवरमध्ये महानगरपालिकेची परवानगी न घेता रस्ता खोदून बेकायदेशीर जल जोडणी केल्याबाबत

**(४०) ६५७९५ (२८-०८-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर (पश्चिम) येथील एका टॉवरमध्ये महानगरपालिकेची परवानगी न घेता विनापरवानगी रस्ता खोदून अनधिकृत जल जोडणीचे प्रकरण निदर्शनास आल्यामुळे महानगरपालिकेने विकासकास २१ लाख ३८ हजार ४०० रूपयाचा दंड ठोठावला असल्याची बाब माहे जानेवारी मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई व उपनगरातील अनेक ठिकाणी विकासक व जल विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृत जलजोडणीची प्रकरणे आहेत ती शोधून त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) दादर (पश्चिम) येथे विकासक मे. रेनिसन्स कन्स्ट्रक्शन यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अंतिम भूखंड क्र. १३, टीपीएस-तीन, माहिम विभाग येथे १५ मि.मी. ची एक व ५० मि.मी. च्या दोन अशा एकूण तीन जलजोडण्या दिनांक २९.०४.२०१४ व दिनांक ०५.११.२०१४ रोजीच्या परवानगीपत्रान्वये देण्यात आल्या आहेत. सदर ठिकाणी कोणतीही अनधिकृत जलजोडणी आढळून आलेली नाही.

विकासक मे. रेनिसन्स कन्स्ट्रक्शन यांनी विनापरवाना रस्ता खोदून जलजोडणी केल्यामुळे त्यांना रु. २१,३८,४०० लाख इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला असून, त्यापैकी रु. ७,१२,८००/- इतक्या रकमेची वसुली करण्यात आली आहे.

(२) अनधिकृत जलजोडणीबाबत तक्रार आल्यास किंवा निदर्शनास आल्यास त्याबाबत खातरजमा करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेत स्ट्रीट फर्निचरमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(४१) ६५८४९ (२८-०८-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत स्ट्रीट फर्निचर गैरव्यवहार झाल्याचा आरोप करून लोकप्रतिनिधींनी या गैरव्यवहाराबाबत महानगरपालिका आयुक्तांना पत्राद्वारे काही महत्वाचे प्रश्न उपस्थित करून सदरच्या प्रश्नाची उत्तरे देण्याची विनंती माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील स्ट्रीट फर्निचर गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर उपस्थित केलेल्या प्रश्नास उत्तरे न देणाऱ्या महानगरपालिका आयुक्त यांच्या विरूध्द शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सह आयुक्त (दक्षता) यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत व सदर निविदा प्रक्रियेबाबत अहवाल सादर करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे.
(३) सदर समितीकडून तांत्रिक बाबी तसेच कागदपत्रांची पडताळणी सुरु असून अद्याप अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

तसेच लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्दयांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उत्तरे देण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलुंड (पूर्व) म्हाडा कॉलनी येथील नालेसफाईत दिरंगाई केली जात असल्याबाबत

**(४२) ६५८६२ (२५-०८-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह उपनगरांमध्ये पावसाळ्यापूर्वीची नालेसफाईची कामे जोरात सुरू असल्याचा दावा महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे मात्र मुलुंड (पूर्व) येथील म्हाडा कॉलनी येथील नालेसफाईत दिरंगाई केली जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नालेसफाई नीट न झाल्यामुळे डासांचा प्रादुर्भावामुळे अनेक जण आजारी पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) मुलुंड (पूर्व) येथील म्हाडा कॉलनी येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षीही नाल्याची साफसफाई करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “टी” विभागामार्फत म्हाडा कॉलनीमधील छोट्या नाल्यांची साफसफाई करण्यात येते. सदर नाल्यांची झालेली साफसफाई तेथील स्थानिक रहिवाशांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## “एल” विभागातील कुर्ला (पश्चिम ) येथील न्यु मिल रोड व मलिक लियाकत हुसेन मार्ग जंक्शनवरील रस्ता रुंदीकरणाबाबतचा प्रस्ताव

**(४३) ६५९७५ (१२-०९-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई “एल” विभागातील कुर्ला (पश्चिम) येथील न्यु मिल रोड व मलिक लियाकत हुसेन मार्ग जंक्शनवरील रस्ता रुंदीकरणाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या रुंदीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुर्व उपनगर, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता रुंदीकरण केल्यास कुर्ला रेल्वे स्थानकापासून वांद्रे कुर्ला संकुलकडे जाण्यासाठी अत्यंत सोयीस्कर होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्यांच्या रुंदीकरणामध्ये बाधित होत असलेल्या बांधकामांतील सर्व्हेक्षण करुन पात्र बांधकामाची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी कुर्ला (प.) येथील न्यु मिल रोड व मलिक लियाकत हुसेन मार्ग यांच्या तयार होणाऱ्या जंक्शनवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत टोटल स्टेशन सर्वे करण्यात आला असून, सदर ठिकाणी जागेवरील आखणी पूर्ण झालेली आहे.

सदर ठिकाणी असलेला बॉटलनेक काढण्याच्या प्रकल्पात एकूण १५१ निवासी व अनिवासी बांधकामे बाधीत होत असून, सदर बाधीत बांधकामांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३१४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. सदर नोटीसींच्या अनुषंगाने बांधकामधारकांनी पात्रता सिध्द करणेकामी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी व पडताळणी सुरु आहे. सदर छाननी पडताळणीअंती परिशिष्ट-II तयार केल्यानंतर पात्र निवासी व अनिवासी बांधकामधारकांचे पर्यायी पुनर्वसन अथवा आर्थिक मोबदला दिल्यानंतर बांधकामांचे निष्कासन करण्यात येणार आहे. तद्नंतर न्यु मिल रोड व मलिक लियाकत हुसेन मार्ग जंक्शनवरील रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव शहरातून (जि.नाशिक) जाणाऱ्या मोसम नदीपात्रात कारखान्यांमधील प्रक्रियेचे सांडपाणी सोडल्याबाबत

**(४४) ६६०५० (३१-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव शहरातून (जि.नाशिक) जाणाऱ्या मोसम नदीपात्रात कारखान्यांमधील प्रक्रियेचे सांडपाणी सोडण्यात येत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारखान्यांतील सांडपाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दयानेत नदीकाठावर मोठया प्रमाणात असलेले उदयोग असून त्यात लुम, प्रोसेसिंग युनिट मोठया असल्याने त्या कारखान्यातून निघणारे केमिकलयुक्त दूषित पाणी पर्यावरणास घातक ठरत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मोसम नदीच्या दूरवस्थेस जबाबदार असणाऱ्या कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही. तथापि, मालेगांव शहरातील महानगरपालिका तसेच आजूबाजूच्या परिसरातील घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया मोसम नदीमध्ये मिसळत असल्याचे आढळून आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

आरोग्य अधिकारी, मालेगाव महानगरपालिका यांच्याकडून अशा प्रकारच्या पाण्यामुळे कुठलीही टायफाईड, कॉलरा, गॅस्ट्रो, हिपॅटायटिस, फायलेरियासिस, अतिसार, दूषित पाण्यामुळे उद्भवणारे त्वचाविकार इत्यादी मध्ये कुठलीही वाढ अथवा साथ आढळून आल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) मालेगाव महानगरपालिका हद्दीतून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता कोणतीही संयत्रणा कार्यरत नाही. त्यामुळे मा. हरित लवाद यांनी विनाप्रक्रिया सांडपाणी सोडण्याबाबत पारित केलेल्या निर्देशांनुसार नुकसान भरपाईचे ७८.८० कोटी रूपये जमा करण्याचे निर्देश मालेगांव महानगरपालिकेला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील जलवाहिनी करिता केलेल्या खोदकामात तेल मिश्रीत पाणी वाहत असल्याचे दिसल्याबाबत

**(४५) ६६११५ (२५-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील साई नगर मधील महात्मा गांधी छेद मार्ग क्र.१ वासन मोटर्सच्या बाजूच्या चौकात शिवशक्ती नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीसाठी नव्याने बारा इंचाची जलवाहिनी टाकताना खोदकाम केलेल्या खड्ड्यात चक्क तेल मिश्रीत पाणी जमा झाल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका कनिष्ठ अभियंता यांनी तपासणी केली तेव्हा बाजूलाच असलेल्या टाटा सर्व्हिस सेंटर मधून तेल मिश्रीत पाणी गटारातून वाहत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे नागरीकांमध्ये घबराट पसरली असून भविष्यात पिण्याच्या पाण्यात ऑईल मिश्रीत पाणी मिसळल्यास हजारो नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) कांदिवली (पश्चिम) येथील शिवशक्ती नगर (एसआरए) सह गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींकरिता जलजोडणी देण्यासाठी ३००, २५० व १५० मि.मी. व्यासाची अंतर्गत जलवाहिनी टाकण्याकरिता विकासकास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०९.०५.२०१७ रोजी परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार विकासकाने ३०० मि.मी. व २०० मि.मी. व्यासाची अंतर्गत जलवाहिनी दिनांक ०१.०३.२०२३ रोजी टाकली आहे. ३०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी ६०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीला जोडण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २४.०४.२०२३ रोजी करण्यात आले होते.

नव्याने बारा इंचाची जलवाहिनी टाकताना मुख्य रस्त्यावरील जलवाहिनीला सदर जलवाहिनी जोडण्याकरिता तेथील पर्जन्य जलवाहिनी तोडण्यात आली होती व त्यामुळे पर्जन्य जलवाहिनीतील पाणी हे जलवाहिनीसाठी खोदकाम केलेल्या खड्ड्यात आल्याचे निदर्शनास आले.

(२) टाटा सर्व्हिस सेंटरमधील अंतर्गत पर्जन्य जलवाहिनीमधून मुख्य पर्जन्य जलवाहिनीमध्ये पाण्याचा निचरा होत होता. सद्य:स्थितीत टाटा सर्व्हिस सेंटरच्या आत गाडी सर्व्हिसिंग केल्यानंतर ती गाडी साफ करुन धुतली जात असल्याचे व सदर पाणी ग्रीस चेंबरमार्फत मलनि:सारण वाहिनीत जात असल्याचे दिसून आले.

(३) विकासकाने टाकलेली जलवाहिनी कार्यान्वित करुन सदर जलवाहिनीवरुन शिवशक्ती नगर (एसआरए) सह गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीमधील "आय विंग" ला जलजोडणी देण्यात आली आहे.

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सदर इमारतीस पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले. सदर इमारतीमधील रहिवाशांकडून दुषित पाणी पुरवठ्याची कोणतीही तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

(४) शिवशक्ती नगर (एसआरए) सह गृहनिर्माण संस्थेच्या विकासकाने सदर जलवाहिनीवर ३०० व २५० मि.मी. व्यासाची अंतर्गत जलवाहिनी टाकली असून, सदर इमारतीस पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा होत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालवणी मालाड पश्चिम मुंबई येथे महानगरपालिकेचे मल:निस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४६) ६६२२० (२५-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालवणी मालाड (पश्चिम) येथे महानगरपालिकेचे मल:निस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र सन १९८३ पासून प्रस्तावित असून गत ३ वर्षांपासून निविदा प्रक्रियेचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया कामे अपूर्ण राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मल:निस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१), (२) व (३) मौजे मालवणी ता. बोरीवली येथील स.नं. २६३(पै) मधील जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेस सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प व इतर तत्सम कामांसाठी दिनांक १९.०७.१९८४ रोजीच्या शासन ज्ञापनाद्वारे मंजूर करण्यात आली. त्यानुसार सन १९९८ मध्ये सदर जागेवर मालाड प्राथमिक मलजल प्रक्रिया केंद्राचे बांधकाम करून ते कार्यान्वित करण्यात आले.

सदर प्रकल्पाकरिता दिनांक २२.०८.२०१९ रोजी वन विभागाची प्राथमिक परवानगी प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतर सन २०१९ ते २०२१ दरम्यान सदर प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तीन निविदा मागविण्यात आल्या. तथापि सदर निविदांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे व काही तांत्रिक बाबींमुळे त्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे सदर निविदेमध्ये फेरपडताळणी करुन आवश्यक ते बदल करण्यात आले सुधारित मानांकनानुसार दिनांक १८.०२.२०२२ रोजी चौथ्यांदा निविदा मागविण्यात आल्या. सदर निविदेस प्रतिसाद म्हणून नियत दिनांक २१.०३.२०२२ रोजी प्राप्त एकूण दोन निविदांपैकी लघुत्तम निविदाकारास दिनांक ३०.०५.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला.

सदर प्रकल्पाचा बांधकाम कालावधी सहा वर्षे इतका आहे. सदर प्रकल्पाची प्रारंभिक कामे सुरु असून प्रकल्पाच्या जागेवरील कांदळवन काढण्याच्या प्रक्रियेचा युध्दपातळीवर पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक परवानगी व जमीन वळतीकरणाची परवानगी प्राप्त झाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील मालवणी येथील एम.एच.बी इंग्रजी व उर्दू मनपा शाळा क्रमांक तीन या शाळेची इमारत उभारण्याबाबत

**(४७) ६६२२१ (२५-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालवणी गेट क्रमांक ०८ मालवणी बेस्ट आगाराजवळ, मालाड (पश्चिम), सर्वे क्रमांक २६३ सी.टी.एस क्रमांक ३५२५ येथील एम.एच.बी इंग्रजी व उर्दू मनपा शाळा क्रमांक तीन ही शाळा माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पाडण्यात आली मात्र अद्याप दुसरी इमारत उभारण्यात आली नाही. त्यामुळे मुलांची शिक्षणाची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून सदर ठिकाणी शाळेची नवीन इमारत तातडीने उभारण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) मालाड (प.) येथील एम.एच.बी. इंग्रजी व उर्दू मनपा शाळा क्र. तीन या शालेय इमारतीचे संरचनात्मक परीक्षण केल्यानंतर सदर इमारत सी-१ प्रवर्गात असल्याकारणाने सदर शालेय इमारतीच्या निष्कासन व पुनर्बांधणीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करण्यात आली आहे.

सदर शालेय इमारत सन २०१८ मध्ये निष्कासित करण्यात आली आहे. तसेच सदर शालेय इमारतीतील विद्यार्थ्यांचे नजीकच्या १०० मी. च्या आत अंतरावर असणाऱ्या एम.एच.बी. गेट क्र. ७ मनपा शाळा व गायकवाड नगर मनपा शाळा या दोन महानगरपालिका शालेय इमारतीमध्ये स्थलांतरण करण्यात आले असून, त्यांचे अध्ययन-अध्यापन सुरु आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होत नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने सदर शालेय इमारतीच्या पुनर्बांधणीकरिता तळमजला + ६ मजल्यांचे आराखडे बनविले आहेत. सदर आराखड्यास नियोजन प्राधिकरण तथा म्हाडाकडून दिनांक १२.१२.२०२२ रोजी मंजुरी प्राप्त झाली असून, त्याअनुषंगाने मंजूर आराखड्यानुसार व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२३ च्या नवीन दरसूचीनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत सदर शालेय इमारत पुनर्बांधणीचे अंदाजपत्रक तयार करुन दिनांक १३.०६.२०२३ रोजी निविदा मागविण्यात आली आहे.

सदर निविदेचा लिफाफा दिनांक १४.०७.२०२३ रोजी उघडण्यात आला आहे. सदर कामाकरिता लघुत्तम दराची निविदा स्विकारण्याबाबत नगर अभियंता यांची मंजुरी घेण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रस्तावित निविदा कामाचे मसुदापत्र सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीकरिता सादर करण्यात आले आहे. सदर मंजुरी प्राप्त झाल्यानंतर आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका) तथा प्रशासक यांची मंजुरी प्राप्त करुन सदर शाळेच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील चुनाभट्टी येथील प्रसूतिगृहामध्ये सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४८) ६६८१६ (३१-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चुनाभट्टी व कुर्ला परिसरातील नागरीकांना उपचार व प्रसूतिकरीता सायन, राजावाडी व कुर्ला पश्चिम येथील रुग्णालयावरील भार कमी करण्याकरीता महानगरपालिकेने चुनाभट्टी येथे स्व.माँ साहेब मीनाताई ठाकरे प्रसूतिगृह बांधले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात सोनोग्रॉफी फक्त मंगळवारी केली जाते त्यामुळे गरजूंना खाजगी रुग्णालयात जावे लागत असून, रुग्णालयात खाजगी कंपनीकडे सोनोग्राफीचे काम दिले असल्याने ते तेथील कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला देत नाहीत तसेच तेथे लहान मुलांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयात औषधांचा तुटवडा असून प्रसूतिगृह असूनही खाटा व्यवस्थित नसल्याने महिलांना इन्फेक्शन होण्याची भीती, सुसज्ज शस्त्रक्रिया विभाग व रुग्णवाहिका नसणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थानातील गळती अशा अनेक सोयी-सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयात सोयी-सुविधा पुरविण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर रुग्णालयात मंगळवार व शनिवार असे दोन दिवस सोनोग्राफी होते. गरोदर मातांची संख्या वाढल्यास आवश्यकतेनुसार इतर दिवशी सुध्दा सोनोग्राफी करण्यात येते.

सदर प्रसुतीगृहात बालरोगतज्ञ व ३ स्त्रीरोगतज्ञ (२ नियमित व १ राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत स्त्रीरोगतज्ञ) कार्यरत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अटी व शर्तींनुसार प्रसुतीगृहाचा खाजगी सोनोग्राफी कंपनीबरोबर करार करण्यात आला असून, सदर खाजगी कंपनीचे अनुदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमित करण्यात येते.

(३) व (४) सदर प्रसुतीगृहात लागणारी औषधे अनुसूचीप्रमाणे विहित पध्दतीने खरेदी केली जातात. सदर प्रसुतीगृहात गर्भवती मातांना जेएसएसके अंतर्गत मोफत औषधे उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच अन-अनुसूचित यादीची औषधे विहित पध्दतीने मागविली जातात.

सदर प्रसुतीगृहात खाटा व्यवस्थित स्थितीत आहेत.

सदर प्रसुतीगृहातील शस्त्रक्रिया विभागात आवश्यकतेनुसार सर्व यंत्रे व संयंत्रे उपलब्ध आहेत. तसेच प्रसुतीगृहातील रुग्णास आवश्यकतेनुसार १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात येते.

सदर प्रसुतीगृहातील अधिकाऱ्यांच्या निवासस्थानातील गळतीबाबतच्या दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रसुतीगृहात माहे एप्रिल, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीत २३१ प्रसुती व ७५ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मलबार हिल येथील १३८ वर्षे जुन्या जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम सुरू करण्याबाबत

**(४९) ६६९८१ (२७-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मलबार हिल येथील १३८ वर्षे जुन्या जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम अद्याप सुरू झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचे कंत्राट गत वर्षी देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जलाशयाचे कामे अद्याप सुरू न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे. सदर कामाचे कंत्राट दिनांक ३०.०५.२०२२ रोजी देण्यात आले आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत सदर कामाच्या पहिल्या टप्प्यात अंतर्भूत असलेल्या सुरक्षा रक्षक कक्ष इमारत व मलबार टेकडी जलाशय-२ च्या जवळ उदंचन केंद्राच्या बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर मलबार टेकडी जलाशयाचे काम ६ टप्प्यांमध्ये प्रस्तावित आहे.

सद्य:स्थितीत मलबार हिल जलाशयामधून दक्षिण मुंबईच्या विविध भागांना पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे मूळ जलाशयाच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी या भागांचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सदर कंत्राटात मूळ जलाशयाच्या पश्चिम बाजूस पर्यायी जलाशय बांधून त्याद्वारे सद्य:स्थितीतील पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याचे नियोजित करण्यात आले आहे. त्यासाठी या नियोजित पर्यायी जलाशयाच्या ठिकाणी बाधीत होणाऱ्या जल उदंचन केंद्र व विद्युत उपकेंद्राचे निष्कासन करण्याकरिता प्रथम मलबार हिल टेकडी जलाशयाशेजारी असलेल्या मलबार

टेकडी जलाशय क्र. २ च्या जवळ पर्यायी उदंचन केंद्राची पुनर्बांधणी करुन कार्यान्वित करणे व विद्युत उपकेंद्र बांधणे, तसेच नवीन विद्युत उपकेंद्राच्या नियोजित ठिकाणी बाधीत होणाऱ्या सुरक्षा रक्षक कक्ष इमारतीचे विस्थापन / स्थानांतर करणे, त्याबरोबरच नियोजित नवीन जलाशयाच्या जागेत असणाऱ्या जलवाहिनींचे योग्य रितीने विस्थापन / स्थानांतर करुन ही जागा मोकळी करण्याचे पहिल्या टप्प्यात प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर कामे प्रगतीपथावर असून ती यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर मूळ जलाशयाचे काम हाती घेण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वरळी येथील महानगरपालिकेच्या मालकीचा भाडेतत्त्वावर दिलेला भूखंडाबाबत**

**(५०) ६७५५९ (२७-०८-२०२३). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबइतील वरळी येथील महानगरपालिकेच्या मालकीचा असलेला भुखंड क्र.२/१६८० व भूभाग क्र. २५४ सी ब्लॅकवूड हॉडज इंडिया प्रा. लि. यांना भाडे तत्त्वावर दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने दुसऱ्या एका कंपनीला हा भूखंड भाडेतत्त्वावर दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने असे भूखंड भाडेतत्त्वावर दिल्यावर परस्पर कंपन्या भूखंड भाडेतत्त्वावर देऊ शकतात काय, याबाबत महानगरपालिकेचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, असे भूखंड भाडेतत्त्वावर दिल्यानंतर संबंधित अधिकारी दिलेल्या कालावधीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले असून, यामुळे महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन होणाऱ्या नुकसानीस जबाबदार कोण आहेत तसेच याबाबत नियमावली तयार करुन भूखंड ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या अभिलेखानुसार, वरळी मालमत्ता योजना क्र. ५२ मधील भूभाग क्र. २५४-सी हा महानगरपालिकेच्या मालकीचा भूभाग दिनांक ३०.०५.१९४३ पासून शाश्वत कालावधीकरिता ब्लॅकवूड हॉडज (इंडिया) प्रा. लि. यांना मक्त्याने दिलेला आहे.

तद्नंतर दिनांक २०.११.१९६९ रोजीच्या विक्री दस्तान्वये ब्लॅकवूड हॉडज (इंडिया) प्रा. लि. यांनी सदर भूभागाचे मक्ता हक्क मे. पी.ई. माईनिंग (कन्स्लटंट) यांना हस्तांतरीत केले आहेत. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या अभिलेखावर सदर भूभागाचे वर्तमान मक्तेदार म्हणून मे. पी.ई. माईनिंग (कन्स्लटंट) यांचे नाव सुचिबध्द आहे.
(२) दिनांक १५.०२.१९६५ रोजीच्या पोटमक्ता दस्तान्वये ब्लॅकवूड हॉडज (इंडिया) प्रा. लि. यांनी सदर भूभागाचे मक्ता हक्क ९७ वर्षांच्या कालावधीकरिता मे. घई लांबा प्रा.लि. यांना पोटमक्त्याने दिले होते. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या अभिलेखावर सदर भूभागाचे वर्तमान मक्तेदार म्हणून मे. पी.ई. माईनिंग (कन्स्लटंट) व पोटमक्तेदार म्हणून मे. घई लांबा प्रा.लि. यांचे नाव सुचिबध्द आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १८.०८.२०११ रोजीचा ठराव क्र. ४८२ अन्वये मंजूर झालेल्या धोरणानुसार मक्तेदार मक्ता करार / मक्ता दस्तऐवजातील अटी-शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय असल्यास भूभागाचे मक्ता हक्क हस्तांतरीत करु शकतात.

तसेच, महानगरपालिकेच्या दिनांक २०.१०.२०१४ रोजीचा ठराव क्र. ६८९ अन्वये मंजूर झालेल्या धोरणानुसार मक्तेदार मक्ता करार / मक्ता दस्तऐवजातील अटी-शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय असल्यास भूभागाचे मक्ता हक्क पोटमक्त्याने देऊ शकतात.
(४) व (५) हे खरे नाही.

महानगरपालिकेचा दिनांक ०९.०७.२००२ रोजीचा ठराव क्र. ४३१ अन्वये मंजूर झालेल्या धोरणान्वये निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार मक्ता कालावधी संपुष्टात आलेल्या भूभागांच्या मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते.

मक्ता नुतनीकरणानंतर पूर्वीच्या मक्ता भुईभाड्यात वाढ करुन सुधारीत दराने मक्ता भुईभाडे आकारले जाते. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महसुलात वाढ होते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.